सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १४६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ३ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## ‘हे सरकार फक्त श्रीमंतांचे’, महाराष्ट्रातील ७६७ शेतकऱ्यांच्या आत्महत्येवरुन राहुल गांधींचा हल्लाबोल

### जानेवारी ते मार्च या कालावधीत राज्यात एकूण ७६७ हून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३नवी दिल्ली**

शेतकऱ्यांच्या आत्महत्या, हा महाराष्ट्राला लागलेला शाप आहे. दरवर्षी अनेक शेतकरी नापिकी, दुष्काळ आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या करतात. आता याच मुद्द्यावरुन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. ’सरकार शेतकऱ्यांचा नाही, तर श्रीमंतांचा विचार करते. मोदींनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट



करणार म्हटले होते, परंतु आज शेतकऱ्यांचे आयुष्य अर्धे होत चालले आहे,’ अशी टीका राहुल यांनी केली.

काही दिवसांपूर्वी समोर आलेल्या माहितीनुसार, जानेवारी ते मार्च या कालावधीत राज्यात एकूण ७०० हून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. आत्महत्या करणाऱ्या बहुतांश घटना विदर्भातील आहेत. शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांबद्दल काँग्रेस आमदारांनी महाराष्ट्र सरकारला जाबही विचारला. काँग्रेस आमदारांनी सरकारने दिलेली १ लाख रुपयांची रक्कम वाढवण्याची मागणी केली आहे.

## अरविंद केजरीवालांचे पुन्हा एकला चलो..

### बिहार विधानसभा निवडणुकीसाठी ‘आप’ने थोपटले दंड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३नवी दिल्ली**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी अरविंद केजरीवालाच्या नेतृत्वाखाली आम आदमी पक्षाने रणशिंग फुंकले आहे. बिहारमध्ये आप इंडिया आघाडीसोबत न जाता स्वबळाचा नारा दिला आहे. पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी याची घोषणा केली. केजरीवालांनी एकला चलो अशी भूमिका घेतल्याने इंडिया आघाडीची डोकेदुखी वाढली आहे.

बिहारमध्ये आम आदमी पक्ष निवडणूक लढवले. इंडिया




आघाडी फक्त लोकसभा निवडणुकीसाठी होती. आता आमची कोणतीही आघाडी नाही. विधानसभा पोटनिवडणूक आम्ही काँग्रेससोबत न जाता लढवली आणि काँग्रेसपेक्षा तीन पट अधिक मते मिळवून विजयी झालो. आता आम आदमी पक्ष हाच पर्याय असल्याचा मेसेज जनतेने दिला आहे’, असे केजरीवाल म्हणाले. दिल्ली विधानसभा निवडणुकीत अरविंद केजरीवालांची आप आणि काँग्रेस स्वतंत्र लढले होते. याचा थेट फटका आपला बसल्याचे निकालाच्या आकडेवारीतून दिसून आले. त्यामुळे बिहार विधानसभा निवडणुकीत केजरीवाल इंडिया आघाडीत येणार का, याकडे लक्ष होते.

बिहारमध्ये तेजस्वी यादव यांची राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस, समाजवादी पार्टी यांच्याबरोबर प्रशांत किशोर यांच्या पक्षाचाही प्रवेश झाला आहे. त्यामुळे विरोधकांच्या मतांच्या विभाजनाचाच धोका असणार आहे.

## नव्या बांधकामांचा वेग होणार सुस्साट; २४ तास वाळू वाहतुकीस परवानगी; बावनकुळेंची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३मुंबई**

राज्यामध्ये २४ तास वाळू वाहतूक सुरू राहणार आहे. सध्या सुरू असलेल्या राज्याच्या विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यान विधानसभेमध्ये राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही मोठी घोषणा केली आहे.

या अगोदर वाळूचे उत्खनन सकाळी सहा ते सायंकाळी सहाच्या दरम्यानच करता येत होतो. तर वाळूची वाहतूक देखील सकाळी सहा ते सायंकाळी सहा पर्यंतच करता येते. मात्र इतर गौण खनिजांना २४ तास वाहतूक करता येते. कारण दिवसा रहदारीचे प्रमाण जास्त असल्याने वाळूच्या वाहतुकीला बंदी असते. मात्र अनेक ठिकाणी विविध प्रकल्पांची काम मुदतीमध्ये पूर्ण करण्यासाठी वाळूची मागणी वाढली आहे.

मात्र या वाळू उत्खननात या ठिकाणी सीसीटीव्ही बसवणे तसेच वाळू वाहतूक



करणाऱ्या वाहनांना जीपीएस बसवणे देखील बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे आता दिवसभर झालेला वाळू उपसा हा रात्री निश्चित प्रकल्पांपर्यंत पाठवला जाणार आहे. जेणेकरून बांधकाम प्रकल्प वेळेत होण्यास मदत होणार आहे. यासाठी संबंधितांना शासनाच्या पोर्टलवर जावून परवानगी घ्यायची आहे. तसेच परवानगी असणाऱ्या वाहनांनाच ही वाहतूक करता येणार आहे.

## मराठीला अभिजात भाषेचा दर्जा, तरी कामकाज इंग्रजीत का? विधानसभेत सुधीर मुनगंटीवार आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई**

इंग्रजी कामकाज पत्रिकेवरून सुधीर मुनगंटीवार यांनी आक्षेप घेतला आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला, तरी कामकाज इंग्रजीमध्ये का? असा सवाल सुधीर मुनगंटीवार यांनी उपस्थित केलाय. इंग्रजी हवी असणाऱ्यांना व्हिसा काढून अमेरिकेला पाठवा, असं मुनगंटीवार म्हणाले आहेत. विधानसभेमध्ये मुनगंटीवार आक्रमक झाले होते.

यावेळी बोलताना




मुनगंटीवार यांनी म्हटलंय की, महाराष्ट्र विधानसभा नियमांत तरतूद नक्कीच आहे. मी देखील ९५ पासून आहे. साधारण कार्यक्रम पत्रिका इंग्रजीत मी तरी बघितली नाही. ऐकून तर घ्या. पहिल्यापासून आहे म्हणजे? आपण सनदी अधिकाऱ्यांना मराठी शिकवायला लावतो. इकडे मराठी अभिजात भाषा करायची अन् मराठी ज्यांना बोलता येत नाही, त्यांना हिंदीची संधी असताना जबरदस्तीने इंग्रजी वापरायला सांगायची. मग हिंदीमध्ये बोलावं.

कार्यक्रमपत्रिका हिंदीत घ्यावी. हिंदीच्या सक्तीला विरोध करायचा आणि इंग्रजीवर प्रेम दाखवायचं. इंग्रजीला आलिंगन द्यायचं. माझा आक्षेप आहे , असं सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटलं आहे. दरम्यान, यावेळी सुधीर मुनगंटीवार यांनी नियमावलीतून इंग्रजी शब्द काढून टाकण्याची मागणी केली. महाराष्ट्र विधानसभा नियम तयार करत असताना इंग्रजीचा प्रभाव असेल. माझी विनंती आहे. एकदा नियम समितीची बैठक घ्यावी अन् इंग्रजी शब्द जिथे जिथे असेल तो तिथून काढून टाका. मराठी शिकलीच पाहिजे. अभिजात भाषा आहे. समजा एखाद्याला खूप अडचण असेल तर हिंदी. पण फारच इंग्रजी समजत नसेल तर पासपोर्ट-व्हिसा काढून अशांना थेट ब्रिटनच्या संसदेत पाठवा. ही काय पद्धत आहे? अशा शब्दांमध्ये सुधीर मुनगंटीवार यांनी आक्षेप नोंदवला आहे.

## ड्रग तस्करीत हात असणारे पोलिस होणार बडतर्फ; मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई**

ड्रग तस्करी प्रकरणात पोलीस सहभागी असेल तर त्या पोलीसाला बडतर्फ करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. मुख्यमंत्री फडणवीस आज विधान परिषदेमध्ये बोलत होते.

काँग्रेस नेते भाई जगताप यांनी ड्रग प्रकरणात विधान



परिषदेमध्ये आज लक्षवेधी मांडली होती. या लक्षवेधीवर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा करत अमली पदार्थांच्या व्यवहारात पोलिसांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग आढळल्यास त्यांना कलम ३११ अंतर्गत बडतर्फ करण्यात येणार असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## ‘खऱ्या मर्दांसारखे निवडणूकीच्या रिंगणात या’ भाजपच्या आशिष शेलारांचे उद्धव ठाकरेंना खुले आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई**

खऱ्या मर्दांसारखे निवडणूकीच्या रिंगणात या, असं मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरे यांना खुलं आव्हान दिलंय. ठाकरेंचा पक्ष निवडणुकीला घाबरणारा आहे. तसंच तथाकथित मर्दांच्या पक्षांचा कारभार, असा टोला त्यांनी लगावला आहे.

सोशल मिडिया पोस्ट करत आशिष शेलार यांनी म्हटलं की,




मुंबई महापालिकेची वेळेवर निवडणूक न घेता तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीच महापालिकेवर प्रशासकाची नियुक्ती केली.नवीन जनगणना झाली नसताना मुंबई महापालिकेची २२७ ची वॉर्ड रचना बदलून मनमानी करीत २३६ ची वार्ड रचना केली. घोळ घालून निवडणूक लांबवली. २३६ वॉर्ड रचनेचा हट्ट करून उच्च न्यायालयात याचिका उबाठा सेनेनेच दाखल केली आणि निवडणूक रोखून धरली.

आता मा. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूका घ्या, असे स्पष्ट निर्देश दिले. निवडणूक आयोगाने तयारी सुरु केली. यापुर्वीच निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आणि दोन निवडणूका लढल्यानंतर आता पुन्हा चिन्ह, आणि पक्षाचे नाव याबाबत न्यायालयात याचिका दाखल केल्या आहे. पुन्हा निवडणूक लांबवण्याचाच डाव आखलेला दिसतोय. निवडणूकीला घाबरणारा हा पक्ष आहे, तथाकथित मर्दांच्या पक्षांचा कारभार, असं आशिष शेलार यांनी म्हटलंय.

मुंबईकरांसाठी भाजपाच लढणारा पक्ष असल्याचं देखील शेलारांनी म्हटलंय. आशिष शेलार यांनी उबाठा सेनेला खुलं आव्हान दिलंय. हिम्मत दाखवा, मैदानात उतरण्याआधीच रडणं सोडा. हिंम्मत असेल तर, खऱ्या मर्दांसारखे निवडणूकीच्या रिंगणात या. या शब्दांमध्ये आशिष शेलारांनी उद्धव ठाकरेंच्या पक्षाला ललकारलं आहे.

## कोराडीच्या वस्त्रप्रक्रिया प्रकल्पात कुचराई खपवून घेणार नाही, बावनकुळेंचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ नागपूर**

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून कोराडी येथे बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सुरु करण्यात आलेला प्रकल्प चांगल्या पद्धतीने चालविण्यात यावा. यासाठी आवश्यकता वाटल्यास आणखी निधीची तरतूद करण्यात येईल. मात्र, आता यामध्ये कुचराई केलेली खपवून घेणार नाही असा इशारा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला. विधानभवनातील महिला व बाल कल्याण विभागाच्या मंत्री अदिती तटकरे यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. त्यावेळी महसूलमंत्री बोलत होते.

कोराडी येथे महिलांच्या सक्षमीकरणासाठी वस्त्रोद्योग उभारण्यात आला आहे. याठिकाणी चांगले काम सुरु असताना इचलकरंजी येथील वरद कंपनीने योग्यप्रकारे



मशीनचा पुरवठा न केल्याने योग्यप्रकारे काम झालेले नाही. त्यामुळे वरद या कंपनीवर गुन्हे दाखल करुन त्यांच्याकडून मशीनचा पुरवठा तात्काळ करुन घेण्यात यावा. तसेच सर्वात चांगले काम करण्याच्या उद्देशाने या प्रकल्पाचे काम करावे अशा सूचनाही त्यांनी केल्या.

महिला व बालकल्याण विभागाच्या मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या, सोशल बफेट या कंपनीवर करण्यात आलेली कारवाई चुकीची असून त्यांना पुढील तीन महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे. या कालावधीत त्यांनी अत्यंत चांगल्या पद्धतीने काम करावयाचे आहे. मात्र, यापुढे असे होता कामा नये. पुन्हा चुकीचा प्रकार घडला तर यापुढे कोणतेही काम देण्यात येणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. या कंपनीच्या संचालिका निवेदिता नाहर व इचलकरंजीतील वरद एन्टरप्रायझेसचा मालक उमेश रॉय जाधवविरोधात ८७ लाखांचा गैरव्यवहार केल्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## आधी दिशा सालियनवर भाष्य, नंतर नितेश राणे अन् आदित्य ठाकरे आमने-सामने

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३ मुंबई**

दिशा सालियन प्रकरणावरुन पोलिसांनी एकप्रकारे आदित्य ठाकरेंना क्लीनचीटचं दिल्याचं पाहायला मिळत आहे. दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणात कोणतीही संशयास्पद माहिती नाही. हे आत्महत्येचे प्रकरण असल्याची माहिती महाराष्ट्र सरकारच्या वकिलांनी मुंबई उच्च न्यायालयात दिली आहे. त्यानंतर, भाजप नेते आणि विद्यमान मंत्री नितेश राणे यांच्याकडून सातत्याने होणार्या आरोपासंदर्भाने प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यातच, शिवसेना खासदार संजय यांनी नितेश राणेंवर जोरदार हल्लाबोल केला. तसेच, नितेश राणेंनी नाक घासून माफी मागावी, असेही म्हटले होते. आता, नितेश राणेंनी याबाबत भूमिका व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे नितेश राणेंनी याबाबत माहिती दिल्यानंतर आदित्य ठाकरे आणि नितेश राणे सभागृहाबाहेर आमने-सामने आल्याचं पाहायला मिळालं. तर, नितेश राणेंनी आदित्य ठाकरेंची मिमिक्रीही केली.

दिशा सालियन प्रकरणावर एसआयटीचा अहवाल १७ जूनला आलेला आहे, कोर्टात काल गेलेल्या अहवालाबाबतची माहिती घ्यावी. कारण, हा विषय नितेश राणेंपुरता नाही. दिशा सालियानच्या वडिलांनीही ॲफिडेविट केलं आहे, हा राजकीय आरोप नाही. दिशा सालियानचे वडिल जे आरोप करत आहेत, ते आरोप राजकीय करत आहेत का? असा सवालही दिशा सालियनने विचारला. तसेच, पिच्चर अभी बाकी आहे, न्यायालयाने १६ तारीख दिलेली आहे तेव्हा काय होतं ते बघू. आताचे सरकार जो काय अहवाल देतं ते बघू. यातला एक अधिकारी या जो यात आहे, याबाबतही मी पत्र दिलेलं आहे, असेही नितेश राणेंनी म्हटलं आहे.

## संपादकीय ......

# रोजगारास प्रोत्साहन

दारिद्र्य आणि बेरोजगारी या भारतापुढील कळीच्या समस्या आहेत. त्यामुळे दारिद्र्यमुक्त भारतासाठी प्रयत्न केले जात आहेत; पण आजही देशात बेरोजगारीचे प्रमाण मोठे असून, तो चिंतेचा विषय आहे; मात्र देशात गुंतवणुकीत प्रचंड वाढ होत असून, पायाभूत सुविधांचा विकास होत आहे. भारतातील उत्पादन क्षेत्राची वाढ जूनमध्ये गेल्या १४ महिन्यांतील सर्वाधिक असल्याची आकडेवारी प्रसिद्ध झाली आहे. जून महिन्यात जीएसटी संकलन १.८४ लाख कोटी रुपयांवर गेले असून, वार्षिक तुलनेत त्यात ६.२ टक्क्यांची वाढ झाली आहे. याचा अर्थ, देशात व्यवसाय-उद्योग जोमाने विस्तारत आहेत, तरीही उत्पादन क्षेत्राची प्रगती अधिक गतीने झाली, तरच युवावर्गाला नोकर्या मिळतील. या पार्श्वभूमीवर देशात रोजगारवाढीला चालना देण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने रोजगाराशी निगडित १ लाख कोटींच्या प्रोत्साहन योजनेला मंजुरी दिली असून, त्याचे स्वागत केले पाहिजे. नव्या योजनेंतर्गत पहिल्यांदाच काम करणार्या कर्मचार्यांना १५ हजार रुपयांपर्यंतचे एक महिन्याचे वेतन मिळणार आहे. कंपनीच्या मालकांना अतिरिक्त रोजगार निर्माण करण्यासाठी दोन वर्षांपर्यंत प्रोत्साहन दिले जाणार आहे.उत्पादन क्षेत्रासाठी आणखी दोन वर्षे वाढीव लाभ दिले जाणार आहेत. २०२४-२५च्या केंद्रीय अर्थसंकल्पात रोजगारनिर्मितीशी निगडित २ लाख कोटींची योजना घोषित केली होती. त्याद्वारे चार कोटी लोकांच्या हाताला काम मिळणे अपेक्षित होते. आता त्याअंतर्गतच ही १ लाख कोटींची योजना राबवली जाणार आहे. ज्यांना नोकर्या मिळणार आहेत, त्यापैकी १ कोटी ९२ लाख लाभार्थी प्रथमच कामगार क्षेत्रात प्रवेश करतील. गेल्यावर्षी महाराष्ट्र सरकारनेही पात्र तरुण-तरुणीला प्रत्येकी दरमहा १० हजार रुपये देणारी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली होती. केंद्राच्या योजनेंतर्गत पहिल्यांदाच नोकरी करणार्या लाभार्थ्यांना दरमहा १५ हजार रुपयांचा निधी दिला जाईल. योजनेच्या दुसर्या भागात कंपनी मालकांना प्रोत्साहन निधी दिला जाणार आहे. किमान ६ महिने सातत्यपूर्ण रोजगार असलेल्या प्रत्येक अतिरिक्त कर्मचार्यासाठी सरकार कंपनीला दोन वर्षांसाठी दरमहा ३ हजार रुपयांपर्यंत निधी देईल. उत्पादन क्षेत्रातील कंपनी असेल, तर तिसर्या आणि चौथ्या वर्षीही हा निधी दिला जाईल.कोणत्याही विकासोन्मुख अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने उत्पादन क्षेत्राची भरभराट होणे, हे महत्त्वाचे असते. शिवाय संशोधन विकास आणि नवोन्मेष परिसंस्थेला मजबूत करण्यासाठी १ लाख कोटींच्या निधीला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. त्यामुळे अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करणार्या स्टार्टअप्सना चालना मिळू शकेल. एनडीए सरकारने गेल्या १० वर्षांत संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या तुलनेत दीडपट अधिक नोकर्या दिल्या असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गतवर्षी एका रोजगार मेळाव्यात सांगितले होते. भरतीचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी अगोदरच्या सरकारने निष्कारण दीर्घकाळ दवडला आणि त्यामुळे लाचखोरीस उत्तेजन मिळाले, असा आरोप पंतप्रधानांनी तेव्हा केला होता. केंद्र सरकारने एक कोटी घरांसाठी छतावरील सौरऊर्जेची योजना सुरू केली असून, त्यातूनही रोजगारनिर्मिती होणार आहे. पायाभूत सुविधांमध्ये ११ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक केल्यामुळेही रोजगार निर्माण होणार आहेत. तसेच देशात सव्वा लाखाहून अधिक स्टार्टअपसह भारताने या क्षेत्रात तिसरा क्रमांक मिळवला आहे. नव्या पिढीतील तरुण अगदी लहान क्षेत्रात नवनवीन कंपन्या सुरू करत असून, त्यामुळे लाखो तरुणांना नोकर्या उपलब्ध होत आहेत. केंद्रीय सशस्त्र पोलीस दलात भरतीसाठी तरुणांना नक्कीच संधी आहे. लष्करी भरती परीक्षा आता हिंदी आणि इंग्रजी व्यतिरिक्त १३ भारतीय भाषांत घेण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे उमेदवारांना समान संधी मिळेल.

# मृत व्यक्तिच्या बनावट आधारकार्डवर प्लॉट विक्री

## सात जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती-** मृत व्यक्तीच्या नावाचे बनावट आधारकार्ड तयार करून व खोटे साक्षीदार उभे करून प्लॉटच्या विक्री प्रकारणात फ्रेजरपुरा पोलिसांनी एका महिलेच्या तक्रारीवरून सात जणांविरुध्द गुन्हा दाखल केला.

आशीष सदाशिवराव ढोले, महेंद्र आणि महादेवराव दरले नाकतोडे (वय ४८), पवन ओमप्रकाश तिवारी (वय ४५), प्रकाश यादवराव मुद्रे (वय ५२), विशाल बालू मकेश्वर (वय २९, सर्व रा. अमरावती) अशी त्यांनी नावे आहेत. महिलेच्या तक्रारीनुसार, त्यांचे वडील रामचंद्र दौलतराव देशमुख यांनी ३० डिसेंबर १९८७रोजी अमरावती जिल्हा परिषदेच्या क्षेत्रातील मौजे राजूरा प्रगणे मांजरखेड येथील शेत सर्वे नं. ४१ व ४२ मधील प्लॉट क्रमांक २५६ हा 'चंद्र एंटरप्रायजेस'चे मालक मनोज गुप्ता (मोरबाग, अमरावती) यांच्याकडून १७२० चौसर फुट खरेदी केला होता. ३० ऑगस्ट २००८ रोजी रामचंद्र देशमुख यांचे निधन झाले यानंतर आशीष ढोले याने देशमुख यांचे बनावट आधारकार्ड तयार करून व खोटे साक्षीदार उभे करुन प्लॉट नाना गणपत खडगे याला विकला, असा आरोप महिलेने तक्रारीत केला आहे. त्या आधारे पोलिसांनी सातही आरोपींविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल । करून पुढील तपास सुरू केला आहे.

# राज्यातील विविध संघातील ६०० कबड्डीपटू विजेतेपदासाठी झुंजणार

## ७१ वी विदर्भ राज्य अजिंक्यपद वरिष्ठ गट पुरुष, महिला कबड्डी स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती-**अमरावती ॲमेच्युअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया व कबड्डी असोसिएशन विदर्भ संघ, नागपूर यांच्या मान्यताप्राप्त अमरावती महानगर कबड्डी (संघ) असोसिएशनच्या यजमानपदाखाली ७१ व्या राज्यस्तरीय वरिष्ठ गट पुरुष व महिला आमदार चषक कबड्डी स्पर्धेचे आयोजन ४ ते ६ जुलै दरम्यान विभागीय क्रीडा संकुल मोर्शी रोड, अमरावती येथे केले आहे. या स्पर्धेत विदर्भातील सर्व प्रमुख महिला व पुरुषांचे संघ सहभागी होणार असून, या स्पर्धेतून राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरीता विदर्भाचा संघ सुद्धा निवडला जाणार आहे. या स्पर्धेत विविध आकर्षक पुरस्कार देणार आहे. या स्पर्धेनिमीत्त राज्यातून सुमारे ६०० हून अधिक खेळाडू विजेतेपदासाठी झुंजणार आहेत. पंच, प्रशिक्षक, मार्गदर्शक हे खेळाडूंसह अमरावतीत येत आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी ५ जुलैला सायंकाळी ६ वाजता ज्यांच्या नावाने ही कबड्डी स्पर्धा आमदार चषक म्हणून घेण्यात येत आहे, असे बडनेरा विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार, महाराष्ट्र विधीमंडळाच्या आश्वासक समितीचे अध्यक्ष आ. रवी राणा यांच्या हस्ते होणार आहे. या वेळी विशेष अतिथी म्हणून खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रताप अडसड, आ. राजेश वानखडे, आ.प्रवीण तायडे, अखिल भारतीय कबड्डी फेडरेशन ऑफ इंडियाचे सचिव ए.उसी रेड्डी आदी उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून माजी खा. कबड्डी असोसिएशन, विदर्भ संघ, नागपूरचे अध्यक्ष रामदास तडस, वर्धा



नगरपालिकेचे उपाध्यक्ष, कबड्डी असोसिएशन, विदर्भ संघाचे सचिव प्रदीपसिंग ठाकूर, अमरावती विभागाचे क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक शेखर भोयर, माजी नगरसेवक व ज्येष्ठ मार्गदर्शक वसंत साऊरकर यांची उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेचे बक्षिस वितरण ६ जुलैला सायंकाळी ६ वाजता होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माजी पालकमंत्री प्रवीण पोटे, माजी खा. नवनीत रवी राणा, आ.उमेश यावलकर, कबड्डी फेडरेशन ऑफ इंडियाचे सचिव ए.उसी रेड्डी, माजी खा. व कबड्डी असोसिएशन विदर्भ संघ, नागपूरचे अध्यक्ष रामदास तडस, सचिव व वर्धा नगरपालिकेचे उपाध्यक्ष प्रदीपसिंह ठाकूर, माजी महापौर विलास इंगोले, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे उपाध्यक्ष ड. प्रशांत देशपांडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष रवीराज देशमुख, भाजप शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, कबड्डी असोसिएशन विदर्भ संघ नागपूरच्या रेफ्रीबोर्डाचे अध्यक्ष सतीश इखार यांची उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेसाठी येणारे खेळाडू, पंच, प्रशिक्षक महिला व पुरुष यांची निवास व भोजन व्यवस्था आयोजन समितीतर्फे केली आहे.




## चहा प्यायल्यानंतर सिडीटीची त्रास- छातीत जळजळ होते?

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक**

**चहा प्यायल्यानंतर सिडीटीची का होते?**

चहाच्या पानांमध्ये टॅनिन असते. जे एक प्रकारचे पॉलिफेनॉल आहे. ज्यावेळी आपण चहाची पाने जास्त उकळता तेव्हा त्यातून टॅनिन बाहेर पडते. दुधात असणाऱ्या केसिन नावाच्या घटकांशी याचा संपर्क होते. जे आपल्या शरीरात आम्लयुक्त संयुग तयार करतात. ज्यामुळे छातीत जळजळ आणि पचनाच्या समस्या उद्भवतात. जर आपण दिवसभरात ३ ते ४ कप चहा प्यायलो तर ६ ते ७ चमचे साखर खातो. यामुळे आपल्याला टाइम २ मधुमेह आणि हायपरग्लाइसेमिया वाढू शकतो.



**२. सिडीटीपासून सुटका कशी मिळवाल?**

चहामुळे आपल्याला सिडीटी होऊ शकते. पण त्यात घातले जाणारे आले, वेलची आणि दालचिनीसारखे मसाले आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. हे पचनक्रिया सुधारण्यास मदत करतात तसेच यामुळे आतड्यांचे आरोग्य सुधारते. हे मसाले आपण चहामध्ये मिसळल्यास आरोग्याला फायदे होतील.

दालचिनीमध्ये दाहक विरोधी गुणधर्म आहेत. जे मधुमेहींसाठी देखील फायदेशीर असतात. वेलची ही तोंड स्वच्छ करण्यासाठी आणि पचनक्रिया सुधारण्याचे काम करते.

लवंगमध्ये वेदनाशामक गुणधर्म आहेत. जे दातांचे आरोग्य चांगले राखण्यास आणि पोकळी-जंत रोखण्यास मदत करते. काळीमिरीमुळे चयापचय सुधारते. आले हे मळमळ आणि अचनाची समस्या कमी करते.

**३. चहा कसा बनवाल?**

चहा बनवताना थोडे पाणी उकळा त्यानंतर त्यात आपल्या आवडीचे मसाले घाला. सर्व मसाले उकळल्यानंतर त्यात चहा पावडर किंवा चहाची पाने घाला. उकळून गाळून घेतल्यानंतर चहामध्ये वरुन दूध घाला. चहा करताना गोड म्हणून गूळ किंवा रॉक शुगर घालू शकतो. यामुळे जळजळ आणि सिडीटीचा त्रास कमी होईल.

# बियाण्याच्या बॅगवरील विविध रंगाचे टॅग काय सांगतात? जाणून घ्या सविस्तर

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक** -पीक पैदासकारांनी विकसित केलेले नवे संकरित अथवा सुधारित वाण शेतकऱ्यांपर्यंत आणि चांगल्या स्थितीत पोहोचावे, यासाठी त्यांचे बीजोत्पादन शास्त्रीयदृष्ट्या चार टप्प्यांत घेतले जाते.

बियाण्याचे प्रकार व बियाण्याच्या बॅगवरील खूणचिठ्ठी (टॅग)

१) मूलभूत/पैदासकार बियाणे

- या बियाण्यांची अनुवांशिक शुद्धता १०० टक्के असते.

- हे बियाणे त्या पीक पैदासकाराच्या देखरेखीखाली तयार केले जाते.

- हे बियाणे सामान्य शेतकऱ्यांच्या शेतात लागवडीसाठी उपलब्ध नसते.

- मूलभूत/पैदासकार बियाण्यासाठी पिवळ्या रंगाची खूणचिठ्ठी (टॅग) लावलेली असते.

स्मार्ट शेती बियाण्याच्या बॅगवरील विविध रंगाचे टॅग काय सांगतात? जाणून घ्या सविस्तर

बियाण्याच्या बॅगवरील विविध रंगाचे टॅग काय सांगतात? जाणून घ्या सविस्तर

**बियाण्याच्या बॅगवरील विविध रंगाचे टॅग काय सांगतात? जाणून घ्या सविस्तर**

पीक पैदासकारांनी विकसित केलेले नवे संकरित अथवा सुधारित वाण शेतकऱ्यांपर्यंत आणि चांगल्या स्थितीत पोहोचावे, यासाठी त्यांचे बीजोत्पादन शास्त्रीयदृष्ट्या चार टप्प्यांत घेतले जाते.

पीक पैदासकारांनी विकसित केलेले नवे संकरित अथवा सुधारित वाण शेतकऱ्यांपर्यंत आणि चांगल्या स्थितीत पोहोचावे, यासाठी त्यांचे बीजोत्पादन शास्त्रीयदृष्ट्या चार टप्प्यांत घेतले जाते.

बियाण्याचे प्रकार व बियाण्याच्या बॅगवरील खूणचिठ्ठी (टॅग)

१) मूलभूत/पैदासकार बियाणे

- या बियाण्यांची अनुवांशिक शुद्धता १०० टक्के असते.

- हे बियाणे त्या पीक पैदासकाराच्या देखरेखीखाली तयार केले जाते.

- हे बियाणे सामान्य शेतकऱ्यांच्या शेतात लागवडीसाठी उपलब्ध नसते.

- मूलभूत/पैदासकार बियाण्यासाठी पिवळ्या रंगाची खूणचिठ्ठी (टॅग) लावलेली असते.

**२) पायाभूत बियाणे**

- हे बियाणे तयार करण्यासाठी मूलभूत बियाणे वापरले जाते.

- पायाभूत बियाण्यांच्या पिशवीवर पांढऱ्या रंगाची खूणचिठ्ठी (टॅग) लावलेला असतो.

३) प्रमाणित बियाणे

- हे पायाभूत बियाण्यांपासून तयार केले जाते.

- प्रमाणित बियाणे हे नोंदणीकृत शेतकऱ्यांच्या शेतावर प्रमाणीकरण एजन्सीच्या मान्यतेनुसार व देखरेखीखाली उत्पादित केले जाते.

- या बियाण्याच्या पिशवीला निळ्या रंगाची खूणचिठ्ठी (टॅग) लावलेला असतो.

**४) सत्यप्रत बियाणे**

- यासाठी प्रमाणित बियाण्यांचा वापर करतात.

- बाजारात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असणारे हे बियाणे आहे.

- हे बियाणे शेतकरी शेतावर तयार करू शकतात.

- मात्र या बियाण्यांची अनुवांशिक शुद्धता चांगली असणे गरजेचे आहे.

- सत्यप्रत बियाण्यासाठी हिरव्या रंगाची खूणचिठ्ठी (टॅग) लावलेला असतो.

टॅगवर खुलासा असावा




अधिसूचित जातीच्या बियाण्याची विक्री करताना बियाण्याच्या बॅगवर बियाणे कायद्यामध्ये निर्देशित केलेल्या बियाणे प्रतीच्या कमीत कमी मूल्याचा दर्जा दाखवणारा माहिती टॅग असणे आवश्यक आहे.

त्यावर पुढील माहिती असणे आवश्यक आहे. पिकाचे नाव, जाती व प्रकार, टॅग क्रमांक, लॉट नंबर, बीज परीक्षणाचा दिनांक, पॅकिंग दिनांक, अंतिम दिनांक, उगवण शक्ती टक्के, अनुवांशिक शुद्धता, भौतिक शुद्धता, पिशवीतील बियाण्याचे एकूण वजन.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# डेप्युटी सीईओ मरसाळे यांचा अतिरिक्त प्रभार काढून घेण्यासाठी सचिवांना पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

***दि. ३अमरावती-*** *आधीच कमी मनुष्यबळ, त्यातच काही अधिकाऱ्यांच्या बदल्यामुळे जि. प. प्रशासनाने महिला व बाल विकास विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (डेप्युटी सीइओ) विलास मरसाळे यांच्याकडे सोपवलेला राज्य सरकारच्या महिला व बालविकास विभागाचा अतिरिक्त पदभार काढून घेण्याचा आग्रह धरला आहे.*

*जिल्हा परिषदेच्या सीइओ संजीता महापात्र यांनी त्यासाठी थेट सचिवांनाच पत्र लिहले आहे. जिल्हा परिषदेत सध्या तीन विभागाला डेप्युटी सीइओ नाहीत. अशा परिस्थितीत आहे त्या अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त पदभार सोपवून कामे केली जात आहेत. याच दरम्यान ग्रामविकास मंत्रालयाने सहा बीडीओंच्या बदल्या केल्या आहेत. यापैकी केवळ वरुडच्या बीडीओंना पदमुक्त करण्यात आले असून इतर सर्व बीडीओंच्या जागी नियुक्त केलेले नवे अधिकारी जिल्ह्यात दाखल होईपर्यंत कुणालाही पदमुक्त केले जाणार नाही, अशी भूमिका सीइओंनी घेतली आहे.*




*त्यामुळेच आहे त्या अधिकाऱ्यांचा योग्यपणे वापर व्हावा, यासाठी जि.प. प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. जिल्हा परिषदेचा महिला व बालविकास विभाग अनेक योजना राबवितो. शिवाय महिला बचत गट, अंगणवाड्यांचे संचालन आदी विषयही या विभागाला हाताळावे लागतात. राज्य शासनाने नव्याने सुरु केलेल्या लाडकी बहिण योजनेचे कामसुद्धा या विभागाला सांभाळावे लागते. त्यामुळे मरसाळे यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या राज्य शासनाच्या महिला व बालविकास कार्यालयाचा अतिरिक्त पदभार काढून घ्यावा, अशी मागणी सीइओ संजीता महापात्र यांनी केली आहे.*

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

गुरुवार दि. ३ जुलै २०२५ शहर/ग्रामिण


# मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची ईटीसी केंद्र, दवाखाने व शाळेची पाहणी



**विदर्भ प्रजासत्ताकदि.३अमरावती**

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी बुधवार, दिनांक ०२ जुलै २०२५ रोजी ईटीसी सेवा व सुविधा केंद्र (भौतिक उपचार केंद्र), आयसोलेशन दवाखाना, अंबिका नगर दवाखाना आणि महानगरपालिकेच्या शाळेला अचानक भेट देत तपासणी केली.ईटीसी केंद्राच्या पाहणीत आयुक्तांनी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सर्व सुविधा तत्काळ उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. केंद्रातील रिक्त पदे लवकरात लवकर भरावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. संबंधित अधिकाऱ्यांनी या महत्त्वाच्या उपक्रमासाठी सजग राहावे, आणि केंद्र सर्व सुविधा युक्त असावे यासाठी प्रयत्नशील राहावे, असे निर्देश देत निधी महानगरपालिका आणि शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.आयुक्तांनी अंबिका नगर व आयसोलेशन दवाखान्याच्या नियोजनाचीही पाहणी केली. यावेळी स्वच्छता, डॉक्टर व कर्मचाऱ्यांची उपस्थिती, उपलब्ध औषधे, रुग्णांसाठी असलेल्या सुविधा, इमारतीचे स्वरूप आदी बाबींवर सखोल चर्चा झाली. दवाखाने चोख व कार्यक्षम राहण्यासाठी आरोग्य सेवांमध्ये कोणतीही तडजोड होऊ नये, यावर भर देत आयुक्तांनी स्पष्ट सूचना दिल्या.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी महानगरपालिकेच्या शाळेचीही पाहणी केली. शाळेतील प्राथमिक वर्ग, शिक्षक संख्येची माहिती, विद्यार्थ्यांची संख्या, शाळेतील भौतिक सुविधा यांची माहिती घेतली.

शिक्षकांशी संवाद साधताना, त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. विद्यार्थी हा केंद्रबिंदू असून, त्यांची प्रगती ही शिक्षकांची जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.शाळेतील क्रीडांगण, वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, शैक्षणिक साहित्य, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सुविधा यासंदर्भातही सविस्तर पाहणी झाली. शाळेच्या गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षणासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले आणि या कामासाठी निधी दिला जाईल, असे सांगितले.या दौर्यात उपायुक्त योगेश पिठे, सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, डॉ. देवेंद्र गुल्हाणे, डॉ. अश्विनी खडसे तसेच अन्य कर्मचारी उपस्थित होते.

# शहरातील एका मोठ्या मॉलमध्ये कारवाई

## ‘स्पा ९९’ सेंटरवर धाड, मॅनेजर ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती** – शहरातील गर्ल्स हायस्कूल चौक रोडवरील एका मोठ्या मॉलमध्ये सुरु असलेल्या स्पा ९९ या सेंटरवर गुन्हे शाखा युनिट २ च्या टिमने छापा टाकल्याने मोठी खळबळ उडाली. बुधवारला सायंकाळी ही कारवाई करण्यात आली. या ठिकाणी मसाज सेंटरच्या नावे

देहविक्रीचा व्यवसाय सुरु असल्याचे आढळले. या ठिकाणावरून आक्षेपार्ह वस्तू, मोबाईल, तसेचनगदी असाएकूण १,१४,७०० रु चा मुददेमाल जप्त केला. तर मॅनेजरला ताब्यात घेतले. स्पा सेंटरचा मध्य प्रदेशातील मालक व दुकान मालकावर गाडगे नगर पोलिसस्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील पो.स्टे. गाडगेनगर हददीतील डेपो रोड ते गर्ल्स हायस्कूल चौक रोडवरील एका मोठ्या मॉलच्या पहिल्या मजल्यावरील स्पा ९९ नावाच्या




मसाज सेंटर मध्ये मसाज थेरपी करण्याच्या नावाखाली अवैध्यरित्या बेकायदेशीरपणे वेशया व्यवसाय चालत असल्याची माहिती पो. नि. संदिप चव्हाण यांना मिळाली. त्यांनी लगेच कारवाई करण्यासाठी पंटर पाठविला. त्यानंतर मॉल मधील पहिल्या मजल्यावरील स्पा ९९ नावाच्या मसाज सेंटर मध्ये छापा टाकला. यावेळी या ठिकाणी देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याचे दिसून आले. सेंटरचा मॅनेजर हा मसाज थेरपी चे नावाखाली अवैध्य वेश्या व्यवसाय





चालवत असल्याने ताब्यात घेतले. गोपी निरजसींग भवरसींग पंडया वय ३५ रा. दस्तुर नगर, चैतन्य कॉलनी अमरावती असे ताब्यातील मॅनेजरचे नाव आहे. यास्पा सेंटरमधून आक्षेपार्ह वस्तू, मोबाईल, तसेच नगदी असा एकूण १,१४,७०० रु चा मुददेमाल जप्त करून ताब्यात घेतला. स्पा सेंटरच्या मालकांबाबत विचारपुस केली असता मालक राकेश रावल रा. तहसील जावरा, जि. रतलाम, राज्य मध्यप्रदेश असल्याचे सांगीतले. तर दुकानाचा मालक अभिजीत दिलीप लोखंडे वय ३८ वर्ष, रा, जुनी बस्ती, मुक्काम रहाटगाव, शिवाजी नगर अमरावती असे सांगितले. या दोघांचा शोध घेतला असता ते सापडले नाही. त्यांच्या विरुद्ध पोलीस स्टेशन गाडगेनगर गुन्हा नोदं करण्यात आला आहे. पुढिल तपासपो.स्टे. गाडगेनगर करीत आहे.ही कामगिरी पोलीस आयुक्त अरविद चावरीया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, पोलीस उपायुक्त सागर पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांचे नेतृत्वाखाली सपोनि महेश इंगोले, पोउपनि संजय वानखडे, एएसआय महेंद्र येवतीकर, पोहेकॉ, गजानन ढेवले, दिपक सुंदरकर, मनोज ठोसर, आस्तिक देशमुख, महिला पोहवा माधुरी साबळे, नापोकों संग्राम भोजने, मंगेश शिदे, पोकॉ योगेश पवार, राजीक रायलीवाले, विशालवाकपांजर, सागरठाकरे, चेतन कराडे, महिला पोलीस अंमलदार वर्षा घोंगडे, चालक पोहेकॉ संदीप खंडारे, राहुल दुधे यांच्या पथकाने केली आहे.

# छत्री तलाव परिसरात भुतनीने युवकाची केली पिटाई

## ऐकावे ते नवलच! व्हिडिओ व फोटो व्हायरल


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**– मित्रांसोबत छत्रीतलाव परिसरात रात्रीला वाढदिवस साजरा करण्याकरिता गेलेल्या युवकाला भुतनीने जबर मारहाण केल्याचा व्हिडीओ सकाळपासून सोशल मिडीयावर व्हायरल होत आहे. मात्र याबाबत संबंधीत पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी कुठल्याच प्रकारची घटना किंवा नोंद नसल्याचे सांगितले. मात्र या घटनेमुळे शहरात चांगलीच चर्चा सुरू



आहे. खोलापुरीगेट ठाण्याच्या हद्दीतील सागर नावाच्या युवकाचा ३० जुन रोजीवाढदिवस होता. तो मित्रांसह केक घेऊन रात्रीला छत्रीतलाव परिसरातगेला होता. सर्व मित्रांसमोर त्याने केक कापला, त्यानंतर अचानक काळ्या पोषाखात भुतनी तिथे आली आणि तीने सागरला जबर मारहाण केली. हा व्हिडीओ वाऱ्यासारखा सोशल मिडीयावर व्हायरल झाला तसेच जखमीचे फोटो सुध्दा व्हायरल झाले. मात्र या घटनेबाबत कोणीच ठोस काही सांगायला तयार नाही.

# बाफना नामक बोगस बियाणे कंपनीने केली शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**– संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सध्या पेरणीची लगबग सुरू असताना अमरावती जिल्ह्यामध्ये बाफना नामक बोगस बियाणे कंपनी ने मोठ्या प्रमाणात अमरावती जिल्ह्यामध्ये बीजोत्पादन क्षमता नसलेले बियाणे विकून संपूर्ण अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केली आहे. त्याबाबतच्या अनेक तक्रारी युवा स्वाभिमान पार्टीचे नेते आ. रवी राणा यांचे कार्यालयात जिल्ह्यातील विविध भागांमधून प्राप्त झालेल्या होत्या. त्याच अनुषंगाने युवा स्वाभिमान पार्टीचे वतीने जिल्हा कृषी अधीक्षक सातपुते यांचे कार्यालयात आंदोलन छेडण्यात आले. दोन दिवसात सदर कंपनीवर कुठल्याही प्रकारची ठोस कारवाई झाली नाही तर युवा स्वाभिमान पार्टीचे वतीने विधान भवन मुंबई येथे बाफना कंपनीचे बोगस बियाणे राज्याचे कृषिमंत्री यांना भेट देण्यात येणार



होते. सदर कंपनी ब्लॅक लिस्ट करण्याची व कंपनीला अमरावती जिल्ह्यामध्ये बियाणे विक्रीस परवानगी देणाऱ्या व त्यांची पाठ राखण करणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी याकरिता गुरुवारला सकाळी दहा वाजता आंदोलन करण्याचा इशारा युवा स्वाभिमान पार्टीचे वतीने देण्यात आला होता.त्याचाच धसका घेऊन विभागीय कृषी आयुक्त प्रमोद लहाडे यांचे दालनामध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीदरम्यान कुठलीही सकारात्मक चर्चा झालेली नसल्याने युवा स्वाभिमान पार्टीचे सर्व पदाधिकारी व शेतकरी बोगस बियाणे घेऊन आंदोलनाकरता मुंबईकडे जात असताना ऐनवेळी विभागीय कृषी आयुक्त लहाडे यांचा फोन युवा सन्मान पार्टीचे जिल्हाध्यक्ष अजय देशमुख यांना आला. युवा स्वाभिमान पार्टीचे मागणीचे अनुषंगाने सकारात्मकता दर्शवत बाफना कंपनीवर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये बियाण्याची तपासणी करून प्रतिबंध घालण्यासंदर्भात लेखी आश्वासनाचे पत्र व्हाट्सअप द्वारे प्राप्त झाले. त्यामुळे गुरुवारला होणारे आंदोलन युवा स्वाभिमान पार्टीचे वतीने रद्द करण्यात आलेले आहे.

# शहरात मोकाट कुत्रे, जनावरांना पकडण्यासाठी महापालिकेची हेल्पलाइन सेवा

## आता एका फोनवर होणार मोकाट प्राण्यांपासून सुटका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**महापालिका क्षेत्रात मोकाट कुत्रे व जनावरांचा प्रश्न सोडविण्यासाठी मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी तक्रारींची तत्काळ दखल घेत त्याचा निपटारा करण्यासाठी एका कॉलवर नागरिकांना सुविधा उपलब्ध करून दिली आहे. याकरिता एक टीम तयार करण्यात आली असून त्या टीम मधील अधिकाऱ्यांचे मोबाईल नंबर जारी करण्यात आले. त्यामुळे आता नागरिकांना मोकाट कुत्रे व जनावरांच्या समस्येबाबत तक्रार करून सुटका करता येईल.

मनपा क्षेत्रांतर्गत मोकाट कुत्रे व जनावरांची संख्या वाढत आहे. गल्लोगल्ली कुत्र्यांचा सुळसुळाट झाला असून कित्येकदा लहान मुलांना चावाघेतल्याच्या घटना घडल्या आहेत, तर वाहनामागे कुत्रे धावल्याने वाहनचालकाचे नियंत्रण सुटल्याने दुर्घटना सुद्धा घडल्या. रस्त्यांच्या मधोमध बसणाऱ्या मोकाट जनावरांमुळेसुद्धा दुर्घटना घडल्या आहेत. मोकाट जनावरांना पकडल्यास त्यांना ठेवण्यासाठी महापालिकाकडे गोरक्षण व गोसेवा केंद्र आहेत, मात्र कुत्र्यांनापकडून ठेवायचं कुठे किंवा त्यांच्यावर काय कारवाई करावी याबद्दल स्पष्ट



गाईडलाईन नसल्याने कुत्र्यांना पकडून ठेवण्यासाठी शेल्टर हाऊस बनविण्यात आले.

महापालिका क्षेत्रात रहाटगाव व कोंडेश्वर येथे शेल्टर हाऊस बनविण्याचे काम पूर्ण झाले. त्यामुळे आता मोकाट जनावरे व कुत्रे पकडण्याची कारवाई महापालिका प्रशासनानेसुरू केली. यासंदर्भात पाच कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे हेल्पलाईन क्रमांक सुद्धा प्रसिद्ध करण्यात आले. नागरिका एका फोनवर या समस्या सांगून त्याचा निपटा करू शकतील.

### या हेल्पलाईनवर तुम्ही संपर्क करू शकता

१) गुणसागर गवई (प्रभारी पशू वैद्यकीय निरीक्षक) मो.७०३०९२२९५८

२) पंकज कल्याणकर (स्वास्थ निरीक्षक) ९८२३३५६९१२

३) डॉ. निलेश सोळंके (पशू वैद्यकीय निरीक्षक) ७०३०९४०२२७

४) सागर मैदानकर(जीवन रक्षण बहुउद्देशीय संस्था) ७०६६४४८८६६

५) संघर्ष भोये(नवयुवक नागरी सेवा सह्योग संस्था) ८६६८७८२४४२

# बेलोरा एअरपोर्टवरील ३६ पैकी १२ उड्डाणे रद्द

## सरकारच्या अधिपत्याखाली अलायन्स एअरचे कामकाज

## सर्वात लोक्लास कंपनीच्या विमानाचे उड्डाण सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

बेलोरा विमानतळावरून मुंबईला विमानसेवा संचालित करणाऱ्या कंपनीची कार्यशैली एवढी चिंतनीय आहे की, एप्रिलपासून बेलोरा विमानतळावरून आठवड्यातून धड तीन उड्डाणेही त्यांना करणे कठिण असल्याचे दिसत आहे. विमानतळाचा शुभारंभ झाल्यापासून आतापर्यंत बेलोरा विमानतळावरून साधारणतः ३६ उड्डाणे व्हायला पाहिजे होती, मात्र त्यापैकी साधारणतः १२ उड्डाणे विविध कारणामुळे रद्द करण्यात आली आहेत.

अमरावतीच्या बेलोरा विमानतळावरून अमरावती-मुंबई उड्डाणे संचालित करणारी अलायन्स एअर कंपनी ही विमान वाहतूक क्षेत्रातील सर्वात लो क्लास दर्जाची कंपनी आहे. अमरावती-मुंबई उड्डाण सुरू करण्याची परवानगी केवळ सरकारी अधिपत्याखालील कंपनीअसल्याने मिळाली आहे हे उल्लेखनीय आहे.अलायन्स एअर कंपनीच्या उड्डाणांमध्ये अनेक अनियमितता आहेत. विशेष म्हणजे, अमरावतीहून मुंबईला आठवड्यातून फक्त तीन उड्डाणे निर्धारीत आहेत. अमरावती येथील बेलोरा विमानतळाचे उद्घाटन १६ एप्रिल रोजी झाले. आतापर्यंत या विमानतळावरून ३६ उड्डाणे नियोजित होती.परंतु यापैकी सुमारे १२ उड्डाणे विविध कारणांमुळे वेळेवर रद्द करावी लागली.विमान




रद्द झाले तरी कंपनीकडून १००० रुपये कापले जातात. १६ जून रोजी मुंबई-अमरावती आणि अमरावती-मुंबई विमान उड्डाणे रद्द करण्यात आली. काही प्रवाशांनी अधिकृतपणे १२,८५३ रुपये देऊन प्रवासाची तिकिटे खरेदी केली.त्यानंतर अमरावती-मुंबई विमान अचानक रद्द करण्यात आले. यासाठी तांत्रिक कारण देण्यात आले.ही पूर्णपणे अलायन्स एअरची चूक होती, तरीही त्यांनी सीट चार्जच्या नावाखाली १००० रुपये कापून प्रवाशांना ११,९७२ रुपये आणि ९९ पैसे परत केले. जर प्रवाशांना विमानात बसवलेच नाही कर मग सीट चार्ज का आकारण्यात आला? असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.अलायन्स एअरच्या रिफंड पॉलिसीतील विलंबाचा फटका हवाई प्रवाशांना सहन करावा लागत आहे. प्रवाशांनी परतफेडीसाठी पाठवलेल्या मेलचे उत्तरही २० ते २५ दिवस येत नाही. यामुळे प्रवासीही नाराज असून त्यांना स्वतःच्या पैशांसाठी त्रास सहन करावा लागत आहे.उल्लेखनीय असे की, ही कंपनी सरकारच्या अधिपत्याखाली चालते. याचा अर्थ सरकार स्वतः या कंपनीची काळजी घेते. कंपनीवर सरकारचे ८०० कोटी रुपये देणे आहे. यामुळे कंपनी चालवणे खूप कठीण होत आहे.

### २० पैकी १४ विमाने बंद, ६ कार्यरत

अलायन्स एअरकडे फक्त २० विमाने आहेत. यापैकी १४ विमाने खराब झाली आहेत. फक्त ६ विमाने देखील कार्यरत आहेत. तथापि, अमरावती-मुंबई विमानसेवा ही या कंपनीच्या फायदेशीर सेवांपैकी एक आहे. वेळेची गैरसोय असूनही, अमरावती-मुंबई ही विमानसेवा नेहमीच भरलेली असते. असे असूनही, कंपनीला प्रॉपर ॲप्रोच मिळालेला नाही.

# शासकीय वसतीगृहातील भोजनाच्या कंत्राटाची चौकशी

## ई निविदा प्रक्रियेत बनावट प्रमाणपत्र सादर

### फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३अमरावती,**शासकीय वसतीगृहात भोजनाचे कंत्राट मिळवण्यासाठी ई निविदा प्रक्रियेत सादर केलेले प्रमाणपत्र बनावट असल्याचे उघड झाल्यामुळे फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अमरावतीच्या अप्पर आदिवासी विभागांतर्गत हा प्रकार उघडकीस आला आहे. सहायक आयुक्त शिवानंद पेठेकर यांनी याविषयी फ्रेजरपुरा पोलिसांकडे तक्रार दिली आहे. त्यानुसार अप्पर आयुक्त स्तरावर शासकीय वसतीगृहामध्ये भोजनाचे कंत्राट देण्यासाठी ई निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. ४ डिसेंबर २०२३ पासून या प्रक्रियेलासुरुवात झाली होती. तसेच ई निविदेकरिता सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची पडताळणीकरण्यासाठी समितीही गठीत करण्यात आली होती. समितीने १६ जानेवारी २०२५ रोजी पुर्वठा दारास पत्र देऊन बोलवून घेतले होते. सर्व



पुरवठा धारकांचे म्हणणे लक्षात घेऊन ७ प्रकल्पाकरिता ८ पुरवठा धारकांचा प्रस्ताव नाशिकला आदिवासी विभाग आयुक्तांकडे पाठवला होता. या प्रस्तावाला शासनाकडून मंजुरीही मिळाली. त्यानंतर १७ मार्च २०२५ रोजीच्या शासनपत्रानुसार अमरावतीच्या स्वामी समर्थ सर्व्हिसेस यांनी ई-निविदेत खोटे प्रमाणपत्र सादर केल्यामुळे चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले. १६ मे २०२५ रोजीप्राप्त चौकशी अहवालानुसार स्वामी समर्थ सव्व्हीसेस यांनी कमला नेहरु मुलींचे मागसवर्गीय वसतीगृह, नेर, जिजाऊ मागासवर्गीय मुलींचे वसतीगृह मंगरुळपीर, या दोन संस्थेचे बनावट प्रमाणपत्र ई निविदेत सादर केल्याचे उघड झाले. हा अहवाल मंत्रालय मुंबई, व नाशिक आयुक्त यांना सादर करण्यात आला. फौजदारी कार्यवाहीसाठी शासनाकडुन पत्र प्राप्त झाल्यामुळे सहायक आयुक्त शिवानंद पेठेकर यांनी फ्रेजरपुरा पोलिसांकडे तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी राहुल गवळी (रा अमरावती) यांच्याविरुध्द कलम ३६३-३, ३४०-२ नुसार गुन्हा दाखल केला आहे

# टाळ मृदंगांच्या गजरात श्रीधर महाराज संस्थानाची पालखी पंढरपुरात दाखल



विदर्भ प्रजासत्ताक
**खामगाव दि. ३-** टाळ मृदंग व विठ्ठल नामाचा जयजयकार करीत घाटपुरी येथील श्रीधर महाराज संस्थानची पायी दिंडी व पालखी आज २ जुलै रोजी सकाळी दहा वाजेच्या सुमारास पंढरपूरात दाखल झाली आहे. वारीचे नेतृत्व गोकुळ महाराज चोपडे हे करत आहेत. पालखीचे यंदाचे २६ वे वर्ष होते.

पायदळ वारीतील पालखीत श्रीधर महाराज यांचा मुखवटा होता. पायी वारीत टाळकरी पताकाधारी यांच्यासह सव्वाशे ते दीडशे वारकरी सहभागी झाले होते. घाटपुरी ते पंढरपूर हे ४६५ किलोमीटरचे अंतर विठ्ठलाच्या दर्शनाची आस लागलेल्या वारकऱ्यांनी ऊन, पाऊस, वारा याची तमा न बाळगता बावीस दिवसांत पूर्ण केले. पालखी पंढरपूर येथील जलाराम बाप्पा मठात १० जुलै पर्यंत मुक्कामी राहणार आहे. या मठात श्रीधर महाराज संस्थानतर्फे ३ ते १० जुलै या कालावधीत भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. भागवत कथेचे वाचन ज्ञानेश्वर महाराज हंबर्डे रा अंत्रज हे आपल्या अमृतवाणीतून करणार आहेत. भागवत कथे बरोबरच विविध धार्मिक कार्यक्रम व कीर्तनकारांची कीर्तने आयोजित करण्यात आली आहेत. त्याचबरोबर संस्थानच्या वतीने दररोज अन्नदान केले जाणार आहे. अन्नदान कार्यक्रमाचा व भागवत कथा श्रावणाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीधर महाराज संस्थान घाटपुरी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ६ महिन्यात ९१ शेतकरी आत्महत्या; ६० प्रकरणे चौकशीकरीता प्रलंबित

## जिल्ह्यात महिनानिहाय झालेल्या शेतकरी आत्महत्येच्या घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३अमरावती,**नापिकी, कर्ज बाजारीपणा व कर्ज परत फेडीचा तगादा या तीन मुख्य कारणांमुळे झालेल्या शेतकरी आत्म हत्यांप्रकरणी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना सहायक अनुदानाच्या रूपाने मदत देण्यात येते. सहा महिन्यात जिल्ह्यात शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून, जानेवारी ते जूनमध्ये ९१ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले. त्यामुळे जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचा फास घट्ट होत आहे, हे तितकेच खरे आहे.

निसर्गाच्या भरवशावर बळीराजा पेरणी करतो. मात्र, या शेतकऱ्याला निसर्गाचा लहरीपणा नडतो. कधी कोरड्या दुष्काळाने तर कधी ओल्या दुष्काळाने शेतकऱ्यांच्या शेतातील पिके नष्ट होऊन बळीराजाच्या स्वप्नांचा चुराडा होतो आणि शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर वाढतच जातो. यातूनच नाइलाजाने शेतकरी टोकाचे पाऊल उचलत आहेत. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना वाऱ्यावर न सोडता शासनाच्या वतीने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक लाख मदत दिली जाते.



यातील ७० हजार कुटुंबीयांना प्रत्यक्ष दिले जातात. तर ३० हजार त्यांच्या बँक खात्यात जमा केले जाते. जिल्ह्यात यंदा ३० जूनपर्यंत सहा महिन्यांत ९१ शेतकऱ्यांनी मरणाला कवटाळले असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. मात्र, यासाठी निधी देण्याची तरतूद असतानाही आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना वेळेत मदत मिळत नाही, ही शोकांतिकाच म्हणावी लागेल.

मदत मिळणार तरी केव्हा ?

जिल्ह्यात यंदा ९१ जणांनी मृत्यूला कवटाळले असून, अद्याप एकाही आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांच्या वारसांना मदत मिळालेली नाही. जेव्हा की तत्काळ अनुदान देण्याचे आदेश असतानाही शासनाकडून निधी अप्राप्त असल्याने मदत मिळणार तरी केव्हा, असा आर्त टाहो आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांकडून होत आहे.

# भाजप म्हणजे ‘डरपोक’ लोकांची ’डी गँग’

## नाशिकमधील नेत्यांच्या भाजप प्रवेशावर संजय राऊत संतापले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**मुंबई दि. ३ -** आजचा भारतीय जनता पक्ष म्हणजे डरपोक लोकांची ’डी गँग’ असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. नाशिक मधील उद्धव ठाकरे गटाच्या नेत्यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश होणार आहे. या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी भाजप उद्या दाऊद इब्राहिम याला देखील पक्षात प्रवेश देईल, असा आरोप केला. इतकेच नाही तर केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी केलेल्या आरोपांना देखील त्यांनी प्रत्युत्तर दिली आहे.

नाशिक मधील ठाकरे गटाचे माजी नगरसेवक आणि महानगर प्रमुख मामा राजवाडे देखील भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. या सर्वांवर गुन्हा दाखल झालेला असून अटक होण्याच्या भीतीने ते पोलिसांच्या रेकॉर्डनुसार फरार आहेत. असे फरार आणि डरपोक लोकच भाजपमध्ये प्रवेश करत असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे. तुमच्यावर भ्रष्टाचार, दंगे, बलात्कार असे कोणते गुन्हे



दाखल असेल तरच तुम्हाला भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश दिला जातो, असा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

नारायण राणे यांनी वयाचे तरी भान राखावे

ज्या व्यक्तीने तीन-तीन वेळा पक्ष बदलले आहेत. जी व्यक्ती स्वतःचा पक्ष चालवू शकली नाही. जी व्यक्ती काँग्रेसमध्ये गेली त्याने काँग्रेसला शिव्या दिल्या. भाजपमध्ये गेली तिथेही त्यांचे सुरुवातीपासून काही जुळले नाही. शिवसेनेमध्येही त्यांनी शेवटी- शेवटी गोंधळच घातला. अशा व्यक्तीला महाराष्ट्र फार गांभीर्याने घेत नाही. अशा शब्दात राऊत यांनी नारायण राणे यांच्यावर पलटवार केला. भाजपमध्ये गेलेला प्रत्येक मराठी माणूस हा महाराष्ट्राचा शत्रू आहे. त्यांनी मराठी माणूस आणि महाराष्ट्र यावर प्रवचन झाडण्याचा अधिकार नाही. नारायण राणे यांनी भाजपमध्ये जाऊन कोकणातील मराठी माणसाचे नुकसानच केले आहे. नारायण राणे यांच्या सारखे सर्व गुलाम नसतात. चामडी वाचवण्यासाठी काही पक्ष बदलत नाहीत. काही स्वाभिमानी लोक आहेत त्यांच्यामुळे आजही महाराष्ट्र टिकलेला आहे. तुम्ही आहात म्हणून किंवा भाजप आहे म्हणून महाराष्ट्र टिकलेला नाही. त्यामुळे आता नारायण राणे यांनी वयाचे तरी भान राखावे, असा सल्ला देखील राऊत यांनी दिला.

नरेंद्र जाधव यांचा संघ परिवाराशी संबंध


नरेंद्र जाधव हे अर्थतज्ञ आहेत. मात्र त्यांचे संघ परिवाराशी संबंध आहेत. असे म्हणत संजय राऊत यांनी त्रिभाषा सूत्र संदर्भात अभ्यास करणाऱ्या समितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मात्र, समितीचे अध्यक्षपदी कोणीही असले आणि कोणी कसाही अहवाल दिला तरी, मराठी वर होणारा अन्याय आणि हिंदी भाषेची सक्ती महाराष्ट्र कदापि सहन करणार नाही. महाराष्ट्र कोणत्याही समितीचा अहवाल स्वीकारणार नाही, असे देखील राऊत यांनी स्पष्ट केले.

मेळाव्याचे मुख्य आकर्षण उद्धव-राज ठाकरे

मराठी भाषेसंदर्भात पाच जुलै रोजी होणाऱ्या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर कमीत कमी गर्दी असावी, व्यास पीठावरील मुख्य आकर्षण उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हेच असावे, लोकांनी तुफान गर्दी करावी आणि विजयी जल्लोष साजरा करावा. या व्यतिरिक्त या कार्यक्रमात कोणताही प्रोटोकॉल नाही. असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे.

# जिल्ह्यातील तेलबिया उत्पादन वाढीचा कृषी विभागाचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**बुलडाणा दि. ३**
जिल्ह्यात तेलबियांचे उत्पादन वाढीच्या दृष्टीकोनातुन जिल्ह्यात तेलबिया उद्योगासाठी चालना देण्याचा व उत्पादन वाढीच्या दृष्टीकोनातुन कृषी विभाग प्रयत्न करत आहे. परंतु, सर्वाधिक उत्पादन होणारी सोयाबीन अजुनही भाव न मिळाल्याने शेतकऱ्यांच्या घरात पडून आहे. जिल्ह्यातील करडी, जवस, सूर्यफुलांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जात नाही. करडी नामशेष होत आली असून मोहरीची लागवडही कमी आहे. एकुण पेरणीच्या ५८ टक्के क्षेत्रावर सोयाबीन या तेलबियांची लागवड होण्याचा अंदाज आहे. तेलबियांमध्ये भुईमूग ४६७, सूर्यफूल २, तीळ ३०० हेक्टर क्षेत्रावर लागवड होणार आहे. त्यामुळे तेलबियांचे उत्पादनच जिल्ह्यात कमी होत असल्याने शासनाचा तेलबिया उत्पादना मागची तळमळ पूर्ण होताना दिसत नाही. एकमेव सोयाबीन या तेलबियांचा आधार असून त्याचे उत्पादन किती होईल, हे सांगता येणे शक्य नाही. शासनाची तेल उद्योग सुरु करण्याचेही प्रयत्न असून त्याकरता विविध सवलती व अनुदान देण्याचीही भूमिका कृषी विभागाची आहे. तेलघाण्यांकडे अधिक जोर करडी



सारखे पिकाचा पेरा नगण्य असा असला तरी काही शेतकरी त्याचा पेरा करुन आता तेलघाण्यांवरुन तेल काढून घेत त्याचा वापर करत आहे. तेलघाणे आता सुरु झाले असून त्याचे तेलही महागडे मिळत आहे, तरीही अनेकांनी या तेलाकडे आपला कल वाढवला आहे. रासायनिक प्रक्रिया केलेल्या उद्योगापेक्षा या घाण्याचे तेलापासून आरोग्याला धोका कमी असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांचे म्हणणे आहे.यंदा मिळणार तेलबिया प्रकिया युनिटकरता लाभ राष्ट्रीय खाद्य तेल अभियान (गळीतधान्य) सन २०२५-२६ योजनेंतर्गत शासकीय,खासगी उद्योग, शेतकरी उत्पादक संघ, कंपनी आणि सहकारी संस्था यांना तेल काढणी युनिट १० टन क्षमता आणि तेलबियांवर प्रक्रिया करण्यासाठी यंत्र सामग्री आणि उपकरणे आणि तेलबिया प्रकिया युनिट करिता लाभ मिळणार आहे. जुलै महिना शेवटचा राहणार आहे.

मागील वर्षी सोयाबीनचे उत्पादन सरासरी होते मागील खरीप हंगामात सोयाबीनेच उत्पादन सरासरी हेक्टरी १५.१० क्विंटल इतके झाले होते. जवळपास तीन लाख हेक्टरवर सोयाबीनची लागवड करण्यात आली होती. भुईमुगाचे उत्पादन यावेळी तर अवकाळी पावसामुळे अल्प झाले आहे. ऐन एप्रिल मे महिन्यातच पावसामुळे भुईमूग काढता आला नाही..

# दालमीलमध्ये चोरी करणाऱ्यास पकडले

**विदर्भ प्रजासत्ताकदि. ३शिरखेड-** दालमीलमध्ये काम करणाऱ्या मजुरांनी मध्यरात्रीच्या सुमारास भिंतीवरून उडी मारून धान्य चोरणाऱ्या चोरट्यास गिहाथ पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. रघुनाथ जगनाथ वावखडे (६५) रा. गणोजादेवी असे अट केतील चोरट्याचे नाव आहे. शिरखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या रिध्दपुर येथील निखिल मधुसुदन भुतहा (३६) यांच्या दालमीलमध्ये ही घटना घडली. आरोपी रघुनाथने यापूर्वीही अशा काही चोऱ्या केल्या आहेत का, याचा शोध पोलिस घेत आहेत.

## बाजारात वृध्द महिलेचा विनयभंग

**विदर्भ प्रजासत्ताकदि. ३शिरखेड,**
एका ४५ वर्षीय माथेफिरू आरोपीने भर बाजारात भाजी खरेदी करणाऱ्या ६० वर्षीय महिलेसोबत अशोभनीय कृत्य करून तिचा विनयभंग केला. शिरखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या परिसरात ही घटना घडली, याबाबत पोलिसांनी राजू रामदास सोनोने (४५) रा.दाभेरी, ता. मोर्शी याच्या विरोधात गुन्हे दाखल केले आहे. राजू हा महिलेला नेहमी त्रास देतो. घटनेच्या दिवशी तो महिलेचा पाठलाग करत बाजारात आला आणि त्याने महिलेचा विनयभंग केला. याबाबत पोलिस पुढील तपास करित आहेत.

## तक्रार केल्याने व्यक्तीच्या घरावर हल्ला

विदर्भ प्रजासत्ताकदि. ३परतवाडा,एका ४२ वर्षीय व्यक्तीने घरासमोर झालेल्या रस्त्याच्या निकृष्ट बांधकामाबाबत अचलपूर येथील बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे तक्रार केली. याबाबत कळताच पाच ते सहा आरोपींनी रात्रीच्या सुमारास तक्रारकर्त्या व्यक्तीच्या घरावर हल्ला करून त्याला बेदम मारहाण केली. नितीन एकनाथ शिंदे (४२) असे जखमीचे नाव आहे. परतवाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या गौरखेडा येथील गायत्री प्लॉट मध्ये ही घटना घडली. याबाबत पोलिसांनी आरोपी अजिंक्य काळे रा. अमरावती व इतर ४ ते ५ जण यांच्या विरोधात गुन्हे दाखल केले असून पोलिस पुढील तपास करित आहेत.-

# सोमवारपासून ‘आयटीआय’ निवडीचा संदेश

## ८ ते १२ जुलैदरम्यान सुरू होणार प्रवेश प्रक्रिया, ४५०६ जागांसाठी ६२०० अर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**यवतमाळ दि ३**
जिल्ह्यात १८ शासकीय तर ४ खासगी आयटीआयमध्ये एकूण चार हजार ५०६ जागा आहेत. यासाठी ६ हजार २०० अर्ज आले आहेत. जनरल मेरिट लिस्ट २८ रोजी जाहीर झाली. २९ आणि ३० जूनदरम्यान अर्जातील त्रुटी दुरुस्त करण्याची संधी दिली होती. १ जुलैला अंतिम यादी जाहीर झाली असून, ७ जुलै रोजी विद्यार्थ्यांना कोणत्या आयटीआयमध्ये प्रवेश मिळेल हे कळणार आहे.

जिल्ह्यात आयटीआयच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्वरित रोजगार उपलब्धीसाठी खासगी तसेच शासकीय असे एकूण २२ प्रशिक्षण केंद्रे उपलब्ध आहेत. संगणक चालक ते बिल्डिंग कन्स्ट्रक्शन, प्लंबर, पेंटर, वायरमन यासह विविध प्रकारचे २० हून अधिक रोजगाराभिमुख कोर्सेस चालवले जात आहेत. अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया १५ मेपासून सुरू झाली. त्याची २६ जूनची डेडलाइन होती. २८ जून रोजी जनरल मेरिट लिस्ट जाहीर झाली. २९ आणि ३० जून असे दोन दिवस अर्ज दुरुस्तीसाठी संधी देण्यात आली होती. त्यानंतर १ जुलै रोजी अंतिम यादी जाहीर करण्यात आली असून, ७ जुलै रोजी मोबाइलवर निवडीचा संदेश येणार आहे. त्यांनी ८ ते १२ जुलै दरम्यान प्रवेश निश्चित करावयाचे आहेत. जिल्हाभरात एकूण १८ शासकीय तर ४ खासगी आयटीआयमध्ये ४,५०६ जागा आहेत. त्यासाठी ६,२०० विद्यार्थ्यांचे अर्ज दाखल झाले आहेत. विद्यार्थ्यांची १ जुलै रोजी अंतिम यादी आली आहे. ७ रोजी निवड झालेल्या आयटीआयचे नावही मिळणार आहे. विद्यार्थ्यांनी प्रक्रियेदरम्यान आपल्या लॉगिनवरून निवडीवर लक्ष ठेवावे.

मेरीटनुसार विचार करणार

ज्या विद्यार्थ्यांना आयटीआयसाठी अर्ज करावयाचा होता तो करता आला नाही, अशा विद्यार्थ्यांना पुन्हा अर्ज करण्याची संधी बुधवारपर्यंत मिळाली. २ जुलै ते ३० ऑगस्टदरम्यान हा अर्ज भरता येणार आहे. त्यांच्या अर्जावर समुपदेशन फेरीमध्ये मेरीटनुसार विचार केला जाईल.

जनजागृती केल्यामुळे अर्जाची संख्या वाढली आयटीआयच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण होताच रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. त्यासाठी या वर्षात सुरूवातीपासूनच विविध कंपन्यांना बोलावून घेत त्यांच्या



गरजा काय आहेत, याची विद्यार्थ्यांना माहिती दिली जात आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना तांत्रिक बाबी पुरवल्या जात आहेत. वर्षभर ही प्रक्रिया राबवून आयटीआय उत्तीर्ण होणाऱ्या प्रत्येकाच्या हाताला काम मिळायला पाहिजे, अशी तयारी करून घेतली जाणार असल्याचे प्राचार्य व्ही. जे. नागोरे यांनी सांगितले.


# अचलपूर बाजार समिती मधील अडत्या म्हणतो..... तो मी नव्हेच

## शेतकऱ्याच्या २० कट्टे गव्हाच्या पोत्यांची झाली ऐसी की तेसी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अचलपूर**

अडत्याच्या निष्काळजीपणामुळे वीस कट्टे गव्हाला अक्षरशः पावसामुळे कोंब फुटले आहे. एफ.ए. क्यू. दर्जाच्च्या गव्हाची अशाप्रकारे माती झाल्यामुळे सदर शेतकऱ्याला हजारो रुपयांचे आर्थिक नुकसान सहन तर करावे लागलेच आहे. शिवाय फार मोठा मानसिक धक्का बसला आहे. याप्रकरणी शेतकरी योगेश बुटे यांनी सचिव योगेश चव्हाण यांना तक्रार दिली असून आर्थिक नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

ठेवला होता. जागेअभावी सदर कट्टे बाजारसमितीच्या कार्यालयातयोगेश बुटे रा. बेलज यांनी मे २०२५ रोजी सुमारास २५ सायंकाळच्या महालक्ष्मी आडत दुकानाचे संचालक प्रदीप धोंडे यांच्या अडत दुकानात २० कट्टे गहू विक्रीसाठीठेवला होता. जागेअभावी सदर कट्टे बाजारसमितीच्या कार्यालयात पुढे असलेल्या झाडाखाली ठेवल्या गेले. योग्य भाव आल्यानंतर विक्री करावी, असे धोंडे यांना बुटे यांनी स्पष्टपणे सांगितले होते. दरम्यान जून महिन्यात पाऊस सुरू झाला. तरी सदर कट्टे सुरक्षित ठिकाणीहलविण्याऐवजी तेथेच ठेवण्यात



आले. अडत दुकानदाराने आपले कर्तव्य समजून सदर कट्टे शेडमध्ये ठेवण्याची जबाबदारी त्यांची होती. अनेक दिवस पाऊस झेलत सदर कट्टे भर पावसातच चिंब होत राहिले. २ जुलै रोजी गुरुवार आठवडी बाजार असल्याने बुटे यांनी २ जुलै रोजी बाजारसमितीमध्ये येऊन गव्हाच्या पोत्यांची पाहणी केली असता त्यांच्या सदर भीषण प्रकार निदर्शनास आला. एवढचा प्रचंड मेहनतीने भर उन्हात ओलीत करून आणि हजारो रुपये खर्च करून गव्हाचे उत्पन्न बुटे यांनी घेतले होते. सदरचे गहू विकून आलेल्या पैशातून बी बियाणे रासायनिक खते आणि शेतीच्या अंतर मशागतीचे स्वप्न कुठे यानी पाहिले होते.मात्र अडत दुकानदाराच्च्या गंभीर चुकीमुळे आणि अक्षम्य दुर्लक्षामुळे त्यांच्या स्वप्नांची राखरांगोळी झाली.

दरम्यानच्या काळात अनेक वेळा संपर्क करून गहू सुरक्षित आहे का, विक्री केव्हा करणार आहात, याबाबत अडत दुकानदाराशी संपर्क साधला असता तुमच्या गहू एकदम सुरक्षित आहे. चांगला भाव आल्यास विकला जाईल, असे त्यांना सांगण्यात आले होते; मात्र आता अडत दुकानदाराने चागलेच घूमजाव केले असूनसदर गहू आपल्या अडतमध्ये ठेवलाच नसल्याचे ते म्हणत असून आपल्या अंगावरील घोंगडे झटकण्याचा प्रयत्न करीत आहे: मात्र बुटे आपल्या मागणीवर ठाम असून जर दोन दिवसांत नुकसान भरपाई दिली नाही, तर बाजारसमिती आवारात आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. पत्राच्या प्रती माजी आमदार बच्चू कडू, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांना दिल्या आहे.

# एस आर पी कॅम्प परिसरात निकृष्ठ सिमेंट रस्ते; कुठे उंचवटा तर कुठे डाबरअभियंत्यावर कारवाईची नागरिकांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

मनपा क्षेत्रातील एस. आर. पी. एफ प्रभाग क्र. ९ मधील व्यंकटेश कॉलनी, गुरुकृपा कॉलनी, मेहरबाबा कॉलनी, गिरमकर ले-आऊट, रामकृष्ण कॉलनी या परिसरातील निकृष्ट सिमेंट रस्ते तक्रारीनंतर सारवासावर करणाऱ्या अभियंत्यांवर कारवाई करण्याची मागणी भारतीय जनता पार्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

एस. आर. पी. एफ. प्रभागक्र. ९. अमरावती येथील व्यंकटेश कॉलनी, गुरुकृपा कॉलपी, मेहरबाबा कॉलनी, गिरमकर ले आऊट, रामकृष्ण कॉलनी या परिसरातील सिमेंट रस्ते, पेव्हीग ब्लॉक व नाल्यांचे कामे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामार्फल उपविभागीय अभियंता यांच्या देखरेखीखाली मागील चार महिन्यांपूर्वी करण्यात आली, परंतु सदर कंत्राटदाराने अत्यंत निकृष्ट



दर्जाचे बांधकाम केल्याने रस्त्यावरुन वाहन गेल्याने धूळ उडून गिट्टी उघडी पडली, तसेच काही ठिकाणी पेव्हीग ब्लॉक लावले तर काही ठिकाणी काहीच नाही, असा मनमानी कारभार संबंधित कंत्राटदार व अभियंता यांचे संयुक्त अपहारामुळे झाल्याचे सदर कामाच्या निकृष्ट दर्जामुळे दिसून येते.परिसरातील रहिवाशांनी उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बाधकाम विभाग क्र. २- यांच्याकडे लेखी तथा मौखिक तक्रारी केल्या होत्या. सद्या सारवासारव करून सिमेंट कॉक्रीट रस्त्यावर कुठे दीड तर कुठे दोन इंचाचा सिमेट काँक्रीटचा थर टाकण्यात आला. त्यामुळे रस्ता हा उच होवून काही ठिकाणी जे पेव्हींग ब्लॉक लावले तो रस्ता कुठे उंचवटा तर कुठे डाबर अशा स्थितीत रस्त्याची डागडुजी करण्याचा केविलवाणा प्रयत्न संबंधित विभागाकडून करण्यात आला.

निकृष्ट बांधण्यात आलेले रस्ते व पेव्हींग ब्लॉक तसेच सदर कामाचे अंदाजपत्रकानुसार दर्जेदार रस्ते नव्याने बांधण्यात यावे. भविष्यात पुन्हा असा प्रकार घडणार नाही, करिता कंत्राटदार उपविभागीय अभियंता क्र. २, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांच्यावर कारवाई करण्याची मागणी भाजपाने केली आहे.

निवेदन देतेवेळी भाजपा शहर जिल्हा सचिव माजी नगरसेविका पंचफुला चव्हाण, संजय चव्हाण, भाजपा विद्यापीठ मंडळ अध्यक्ष प्रफुल्ल बोके, माजी नगरसेविका पद्मजा कौडण्य, राहुल गवळी, संजय तायडे, वैशाली प्रधान, अमित कुळवंत आदी भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# मा.खा.नवनित राणा यांनी वारकऱ्यांना शुभेच्छा देऊन पांडुरंगाचा जयघोष करुन केले विशेष गाडीला रवाना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि३ अमरावती**

दरवर्षीप्रमाणे आषाढी एकादशीनिमित्त अमरावती जिल्ह्यातील हजारो वारकरी पांडुरंगाच्या चरणी नतमस्तक होण्याकरिता व दर्शन घेण्याकरिता पंढरपुरला जात असतात. कोणी पैदल वारीने तर कोणी खाजगी गाडीने प्रवास करुन आषाढी एकादशीच्या पंढरपुर येथील महाउत्सवात सहभागी होतात. दरवर्षी रेल्वे विभागाद्वारे अकोली रेल्वे स्टेशनवरुन अमरावती जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील वारकऱ्यांसाठी विशेष गाडी देऊन वारकऱ्यांची पंढरपुर जाण्यासाठी व्यवस्था केली जाते. त्या अनुषंगाने अकोली रेल्वे स्टेशनवर आज वारकऱ्यांसाठी विशेष ट्रेनचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष पंढरपुर गाडीला दरवर्षी आ.रवि राणा व मा.खासदार तथा भाजपा स्टार प्रचारक नवनित राणा ह्या हिरवी झंडी दाखवून रवाना करतात. आज सुद्धा नवनित राणा यांनी गाडीतील प्रत्येक वारकऱ्याला भेटुन पंढरपुर प्रवासाच्या मंगलमय शुभेच्छा दिल्या व विशेष गाडीला रवाना केले. यावेळी भारतीय जनता पार्टी व युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने स्टेशनवर आयोजित फराळ वाटपाच्या कार्यक्रमात नवनित राणा यांनी स्वत: उसळीचे व केळीचे वाटप केले. त्याचप्रमाणे पांडुरंगाच्या चरणी सर्व वारकऱ्यांच्या जीवनात तसेच सर्वसामान्य जनतेच्या जीवनात सुख समृद्ध येवो यासाठी विठ्ठलाकडे प्रार्थना सुद्धा केली. याप्रसंगी भाजपा शहर-ग्रामिण अध्यक्ष डॉ.नितीन धांडे, धडझ चे मार्गदर्शक सुनिल राणा, कमल किशोर मालानी, सुनिल काळे, संजय नरवणे, ज्योती सैरिसे, सोनाली नवले, सुमती ढोके, संजय हिंगासपुरे, नितीन बोरेकर, ललीत समदुरकर, सचिन भेंडे, राजीव कुरील, गंगा खारकर, राधा कुरील, मेघा हिंगसपुरे, शितल वाघमारे, अल्का सरदार, भारती गुहे, ज्योत्सना शेठे, बादल कुलकर्णी, राजेश बोकाडे, प्रफुल बोके, श्रीकांत धानोरकर, शुभांगी टाले, रोशनी वाखडे, गौरव बांते, तृप्ती वाठ, सुधिर वाघ, शाम हिंगासपुरे, कार्तिक सांभेकर, अजय जयस्वाल, ज्योती यावलीकर, अमोल इंगळे, अविनाश काळे, विरेंद्र उपाध्याय, डॉ.बाळापुरे, अशोक पांडे, माहोरे काका, शेळके साहेब, सिद्धार्थ बोथरा, श्याम कथे, राजेश बनारसे, खुशाल गोंडाणे, संजय हिवराळे, काशीराम गावंडे, सारिका अवघड, दिनेश ठाकरे, मंगला जाधव, सविता नेवारे, वंदना जामनेकर, संजय गायकवाड, चंदा लांडे, अजय परवतकर, अश्विनी ढोके, सुरेश पडोळे, आकाश पाटील, सुरज मिश्रा, गजानन बोरडे, विनोद येवतीकर, बाळु इंगोले, प्रकाश माहोरे, निता खडसे, राजु बन्नोरे, नरेश अतकरे, राजु तेलखडे, दिलीप भाकरे, सतीश मिश्रा, विलास धोंगडे, चरणदास भगत, सुरेंद्र सुर्यवंशी, प्रतिभा महाजन , कल्पना मेश्राम, संजय गुरु, योगेंद्रसिंग खोजरे, खुशाल गोंडाणे, मनोहर मारोडकर, प्रविण अरक, राजकिशोर पेठे, आशिष किनेकर, सतीश वानखडे, भास्करराव आडे, प्रदिप घडेकर, बोंडे काका, निखील तिवारी, ऋषिकेश जाधव, जय सापरिया, कुसुम खंडारे, पांडुरंग खंडारे, रत्नाताई पाटील, आनंद पांडे, शिला राऊत, सागर पडोळे, मिना विलायतकर, प्रशांत कावरे, राजु कोरडे, संजय हिरोडे, निरज गवई, सुधीर लवणकर, राजेश दातखोरे, आनंद भोयर, मनोज ढवळे, संकेत गादे, प्रसाद बिसने, आरती शेंडे, मिरा माकोडे, छाया माकोडे, प्रिती देशपांडे, साक्षी उमक, मनिषा गणविर, कल्पना शिखरे व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# शबरी आर्थिक विकास महामंडळात मेगा घोटाळा?

## मर्जीतील लाभार्थ्यांना लाखोचं कर्ज – गरजूंना डावललं!बेरोजगार आदिवासी तरुणांचा हक्क पायदळी : शासकीय कर्मचाऱ्यालाही मिळवून दिला 'हक्काचा' लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

राज्य सरकारकडून आदिवासी समाजाच्या आर्थिक, सामाजिक सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविल्या जातात. मात्र या योजनांचा लाभ खरोखर गरजूंपर्यंत पोहोचतोय का, हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शबरी आर्थिक विकास महामंडळाच्या कर्ज योजनेत धारणी येथील व्यवस्थापक गणेश साखरे यांच्याकडून मोठा गैरव्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.सामाजिक कार्यकर्ते संजय सोळंके यांनी याप्रकरणी कारवाईची मागणी केली असून भ्रष्ट अधिकारी गणेश साखरे यांची सखोल चौकशी करण्यात यावी अश्या आशयाचे निवेदन वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. या योजनेंतर्गत गरजू बेरोजगार आदिवासी तरुण-तरुणींना व्यवसाय सुरू करण्यासाठी १ ते ५ लाख रुपयांपर्यंत कर्ज दिलं जातं. मात्र व्यवस्थापक साखरे यांनी योजना गरजूंवर खर्च करण्याऐवजी मर्जीतील लोकांवर उधळली. विशेष म्हणजे बोराळा येथील एका आश्रमशाळेतील शासकीय कर्मचाऱ्यालाही हॉटेल व्यवसायासाठी थेट ५ लाखांचे कर्ज मंजूर करून दिल्याचे समोर आले आहे! महत्वाचे म्हणजे ज्यांना कर्ज मंजूर करण्यात आले त्यांचे हॉटेल किंवा दुकानाचे छायाचित्रे सुद्धा इतर व्यावसायिकांची असल्याचे उघड झाले आहे.शिराळा येथील एका हॉटेल व्यवसायासाठी पाच लक्ष रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले मात्र ते हॉटेल दुसऱ्या व्यक्तीचे असून बंद असल्याचे समजते. बेरोजगार आदिवासी तरुण रेंगाळत राहिले, आणि पगारधारक कर्मचाऱ्याला योजना हातोहात मिळाली. ही बाब सामाजिक न्याय आणि शासन धोरणांचं सरळ उल्लंघन ठरते. अनेक वर्षांपासून ठराविक व्यक्तींनाच लाभ दिला गेला, असा आरोप सामाजिक कार्यकर्ते संजय सोळंके तसेच स्थानिकांनी केला आहे.आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यापासून रोखण्याचा हा प्रकार असून संविधानाच्या अनुच्छेद १४, १५(४), १६ व ४६ नुसार आदिवासींसाठी आरक्षण व योजना आहेत. मात्र या योजनांचा लाभ अपात्रांना देणे म्हणजे संविधानाचा सरळ अपमान आहे, अशी प्रतिक्रिया आदिवासी समाजातून उमटत आहे.

### २०१९ ते २०२५ या काळातील वाटप संशयाच्या भोवऱ्यात!

या कालावधीत झालेल्या कर्जवाटपाच्या फाईलींची चौकशी केल्यास मोठ्या प्रमाणावर अपारदर्शकता व अनियमितता उघड होणार असल्याची शक्यता आहे. त्यामुळे विभागीय चौकशीची मागणी करत त्वरित शिस्तभंग कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते संजय सोळंके यांनी केली आहे.

### भ्रष्ट अधिकाऱ्याला नोकरीतून बरखास्त करावे

आमचा आदिवासी समाज पुढे जाण्यासाठी प्रयत्न करतोय मात्र अधिकाऱ्यांच्या लाचखाऊ मानसिकतेमुळे आदिवासी समाज मागे राहतो आहे. शासन आदिवासींना झुकते माप देतंय मात्र भ्रष्ट अधिकारी आजही आदिवासींचे शोषण करतंय ही वास्तविकता आहे.शबरी आर्थिक विकास महामंडळ धारणी येथील व्यवस्थापकाने कर्ज वाटप प्रकरणात केलेला प्रकार म्हणजे आदिवासींवर अन्याय असून याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यावर निलंबन नव्हे तर नोकरीतून बरखास्त करावे अशी आमची मागणी आहे.



**ॲड. पवन वाडीवेबिरसा क्रांती दल (म.रा.)**

शबरी अंतर्गत कर्जवाटप प्रक्रिया करतांना प्रकल्प अधिकारी यांच्या समितीमधील सदस्य संबंधित कागदपत्रांची शहानिशा करून नंतर कर्ज वाटप करण्यात येते.मी एकटा कोणतेही निर्णय घेऊ शकत नाही.शासकीय कर्मचारी यांना लाभ दिल्या गेला असेल तर त्यांची माझ्याकडे रीतसर तक्रार करावी मी संबंधित व्यक्तीवर कायदेशीर कार्यवाही करेल यात शंका नाही

**गणेश साखरे,**
**व्यवस्थापक शबरी आर्थिक विकास महामंडळ धारणी**

## घनकचरा व्यवस्थापनासाठी सार्वजनिक नवे धोरण - मंत्री उदय सामंत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३ मुंबई**

सांस्कृतिक ग्रामपंचायतींनी मुंबई महानगरपालिकेपासून ते राज्याच्या स्वरूपापर्यंत लक्षात घेऊन व्यापक धोरण आखले जाईल , अशी माहिती मंत्री सामंत यांनी विधानपरिषदेत दिली.

सदस्य प्रज्ञा सातव यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देताना सामंत बोलत होते. सदस्य सर्व शशिकांत विकास , निरंजन दाखरे यांनी जाहीरात नमूद केले. मुंबईत सुमारे सात हजार मेट्रिक टन कचरा तयार होत असल्याचे सांगत श्री. सामंत , देवनार डम्पिंग ग्राऊंड १९३० पासून साच कचरा हटवून ती जागा मोकळी कंपनी काम , कांजूरमार्ग म्हणाले हा पर्यायी उपाय ठरला आहे. सार्वजनिक स्थिती आणि वातावरणात पडलेल्या परिस्थितीमध्ये सर्व समस्या आहेत. आपण नवीन धोरणात पर्यावरणाच्या लोकांचा देखील समावेश केला जाईल , असे श्री. सामंत यांनी स्पष्ट केले. मंत्री श्री. सामंत म्हणाले , महालेखा नियंत्रक संचालक तत्त्वानुसार नियमावली केली जात असून , भविष्यात डम्पिंग संकलन कचऱ्यावर आधारित वीज निर्मितीचा विचार राज्य सरकार करत असल्याचे श्री. सामंत यांनी सांगितले.

# दर्यापूर उत्पादन शुल्कचा कारभार चालतो अचलपुरातून

## नवीन बिल्डिंग बांधकामाच्या नावाखाली कार्यालय बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३दर्यापूर**

प्रशासकीय लालफितशाही कितीप्रबळ झाली आहे, याचा उत्तम नमुना दर्यापुरात पहायला मिळत आहे. कार्यालयाची बिल्डिंग जीर्ण झाली, या सबबीखाली इतरत्र कार्यालय न हलविता थेट अचलपुरातच स्थलांतरित करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकारामुळे व्यवसायिक तसेच सर्वसामान्य नागरिकांनाही चांगलेच हेलपाटे घ्यावे लागत आहे.

दर्यापूर येथे दारू उत्पादन शुल्क कार्यालयाची इमारत अतिशय जीर्ण झाली होती. याची दखल घेत खा. बळवंत वानखडे यांनी ९ सप्टेंबर २०२४ ला नवीन इमारतीचे भूमिपूजन केले. त्या बिल्डिंगचाबांधकामाचा शुभारंभ झाला असून परिसर स्वच्छ करण्यात आला आहे.



आणखी दोन वर्ष तरी बिल्डिंग पूर्ण उभी करायला लागेल. तोपर्यंत दोन वर्ष या कार्यालयाने दर्यापूर येथे शासनाची किंवा भाड्याची खाजगी जागा घेणे अपेक्षित होते. मात्र तसे न करता अचलपूर येथे हलवण्यात आलेले आहे.त्यामुळे एखादा परवाना काढायचा असेल किंवा कार्यालयीन काम असेल तर थेट अचलपूरच गाठावे लागते. तालुक्यातील बार अथवा दारु दुकानांची पाहणी करण्यासाठी महिला अधिकार आवर्जून येतात व निघून जातात.

दर्यापूरकरांना कुठल्याही कामासाठी अचलपूरला जाणे, हे कितपत योग्य आहे. वरिष्ठ कार्यालयाने या बाबीचा विचार करावा, अशी मागणी रोहिणी फाउंडेशन दर्यापूरचे अध्यक्ष किशोर ठाकूर यांनी केली आहे. लवकरच ते खा. बळवंत वानखडे यांनासुद्धा भेटणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# पेट्रोलने भरलेल्या टँकरने महिलेला चिरडले

## महिलेचा जागीच मृत्यू : उड्डाण पुलावर अपघात झाला




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

अमरावती शहरातून गेलेल्या उड्डाण पुलावर आज दुपारच्या सुमारास भीषण अपघात झाला आहे. यात पेट्रोलने भरलेल्या टँकरने दुचाकीला जोरदार धडक देत उडविले. यात दुचाकीस्वार महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. या अपघातानंतर उड्डाण पुलावर वाहतूक काही वेळी खोळंबली होती. दरम्यान पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत वाहतूक सुरळीत केली.

अमरावती शहरातील इर्विन चौक ते राजकमल चौकापर्यंत असलेल्या उड्डाण पुलावर हा अपघात झाला असून या अपघातात वर्षा खाळंगे असे या मृत महिलेचे नाव असून अमरावती शहरातील अर्जुन नगर परिसरातील रहिवासी आहे. दरम्यान महिला स्कुटीने जात असताना पेट्रोलने भरलेल्या ट्रॅकरने त्यांच्या गाडीला जोरदार धडक दिली. या धडकेत महिला खाली पडल्यानंतर ट्रॅकरच्या चाकाखाली सापडल्या. व त्यांच्या घटनास्थळीच दुर्देवी मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्यात आला असून कुंटुबीयांनी एकच आक्रोश केला. तर पोलिसांनी अपघातग्रस्त ट्रॅकर ताब्यात घेतला असून सिटी कोतवाली पोलीस पुढील तपास करत आहेत.

# छत्री तलाव जवळ युवकाला स्त्री भूतनीने मारल्याचे व्हिडिओ

## फोटो सोशल मीडियावर.... अफवांचा बाजार कोणीही विश्वास ठेवू नये अंधश्रद्धा निर्मूलन समिती चे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ अमरावती**

अमरावती शहरात छत्री तलाव परिसरात घडलेल्या एका घटनेचे व्हिडिओ खूप जोरात व्हायरल होत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे,काही युवक आपला वाढदिवस साजरा करण्यासाठी रात्रीच्या वेळी छत्री तलाव या निसर्ग रम्य वातावरणात मित्रा सोबत गेला असता त्याला अचानक एका स्त्री भूतनीचा रडण्याचा आवाज ऐकू येतो ते पाहण्यासाठी गेला असता त्याला स्त्री भूतनी एका काळा कपड्यांमध्ये दिसते आणि त्याला मारते असे व्हायरल झालेल्या फोटो मध्ये दिसत आहे आणि एक व्हिडिओ मध्ये संपूर्ण अंधार असून त्यामध्ये फक्त एका स्त्री भूतनीचा चा रडण्याचा आवाज ऐकू येतो या व्हायरल फोटो व्हिडिओ मुळे संपूर्ण भयभीत वातावरण निर्माण झाले असून सायबर पोलिस याचा व्हायरल झालेल्या फोटो व्हिडिओचा तपास करत आहे..



नागरिकांनी या व्हायरल झालेल्या फोटो व्हिडिओ वर विश्वास ठेऊ नये असे आवाहन पोलिसांनी केलं आहे,ज्या गोष्टी अस्तित्वात नाही त्यामुळे समाजामध्ये दहशतीचे व भीतीचे वातावरण निर्माण होत आहे, अशाप्रकारे अफवा पसरवणे कायदेशीर गुन्हा आहे, पोलीस प्रशासनाने अशा प्रकरणाची तात्काळ दखल घ्यायला पाहिजे तर लोकांनी देखील अशा अफवावर विश्वास ठेवू नये असं आवाहन अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अमरावती जिल्हा संघटक हरीश केदार यांनी केलं आहे

# शेतजमिनींची कागदपत्रे मिळण्यासाठी राज्यात 'भू-प्रणाम' केंद्राची सुरवात; कोणती कागदपत्रे मिळणार?




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

जमीनविषयक विविध कागदपत्रे देण्यासाठी राज्यात भूमी अभिलेख विभागाने सेतू केंद्राच्या धर्तीवर सुरू केलेल्या भू-प्रणाम केंद्राची संख्या आता शंभरीपार होणार आहे.

विभागाने पहिल्या टप्प्यात सुरू केलेली ३० केंद्रे जिल्हास्तरावर सुरू होती. दुसऱ्या टप्प्यात हे केंद्र तालुकापातळीवरील कार्यालयात सुरू होणार आहेत.

या केंद्रांमुळे नागरिकांना घरबसल्या मिळकत पत्रिका काढण्यासाठी अर्ज करता येईल, त्याचबरोबर अर्जामधील त्रुटी दूर करण्यासाठी ऑनलाईन पूर्तता करता येणार आहे.

भूमी अभिलेख विभागातर्फे वेगवेगळी कागदपत्रे दिली जातात. त्यासाठी नागरिकांना या कार्यालयांमध्ये हेलपाटे मारावे लागतात.यावर तोडगा म्हणून तसेच नागरिकांना उत्तम सुविधा मिळावी सेवा मिळावी यासाठी भूमी अभिलेख विभागाने राज्यातील ३० जिल्हा मुख्यालयांमध्ये सेतू सुविधा केंद्रांसारखे अत्याधुनिक सुविधा केंद्रे उभारली आहेत.

या सुविधा केंद्रांना भूप्रणाम केंद्र असे नाव देण्यात आले आहे. जिल्ह्याच्या ठिकाणी असलेले भूमी अभिलेख उपअधीक्षक आणि नगर भूमापन अधिकारी कार्यालयांच्या ठिकाणी ही सुविधा केंद्र सुरू आहेत.

महत्त्वाचे जुने कागदी अभिलेख स्कॅन करून त्याच्या नकलादेखील उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या आहेत.पहिल्या टप्प्यात सुरू केलेल्या केंद्रांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून दुसऱ्या टप्प्यात केंद्राची संख्या आणखी ३५ केंद्र सुरू होणार आहे. हे केंद्र उभारण्याचे काम सध्या सुरू असून १५ ऑगस्टपर्यत ती सुरू होणार आहेत.त्यानंतर तिसऱ्या टप्प्यातील आणखी ३५ भूप्रमाण केंद्र डिसेंबरअखेरीस सुरू होणार आहेत. वर्षअखेरीस एकूण १०० भू-प्रणाम केंद्रे सुरू होणार आहेत. केंद्रांची संख्या वाढल्यामुळे सामान्य नागरिकांचे हेलपाटे वाचणार आहेत.

**कोणती कागदपत्रे मिळणार?**

संगणकीकृत मिळकतपत्रिका, सातबारा उतारा, रंगीत नकाशे, फेरफार नोंदीचा उतारा, परिशिष्ट अ, ब ची प्रत, नमुना ९ व १२ ची नोटीस, रिजेक्शन पत्र, निकालपत्र, अर्जाची पोच, त्रुटीपत्र, विवादग्रस्त नोंदवहीचा उतारा, अपिल निर्णयाच्या प्रती व संगणीकृत तयार होणारे अभिलेख उपलब्ध असतील.

# उद्याला नांदगावात भव्य महाआरोग्य तपासणी शिबीर

## मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेण्याचे शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांचे आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ नांदगाव खंडेश्वर**


शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने नांदगाव शहरातील बारी समाज भवन येथे मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन केले असून तालुक्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी केले. डॉ.राजेंद्र गोडे वैद्यकीय महाविद्यालय अमरावती येथील तज्ञा डॉक्टर स्त्री रोग तज्ञ, अस्थी रोग तज्ञ, नेत्र रोग तज्ञ,चर्म रोग तज्ञ, हृदय रोग तज्ञ मधुमेह रोग तज्ञ, शल्य चिकित्सक तज्ञ, कान नाक घसा, मोती बिंदू तपासणी इत्यादी तपासण्या मोफत करून औषधोपचार करण्यात येईल. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष्याच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले असून यामध्ये पोटाचे विकार, मुतखडा, फिशिअर, अपेनडिक्स, मुळव्याध, भगंदर, किडनीचे विकार, हाडाचे दुखणे, डोळ्याचे आजार, बी.पी. थायरॉईड, सर्दी खोकला ताप, वात विकार, गरोदर स्त्रियांची तपासणी, त्वच्या रोग इत्यादी आजारावरील रोगांचे निदान करण्यात येणार आहे. या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हान शिवसेनेचे समन्वयक प्रकाश मारोटकर व निलेश इखार यांनी यांनी केले.

गोर गरीब नागरिकांची व महिलांची आर्थिक परिस्थिती नसल्याने त्यांच्या करीता मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले असून तपासणी नंतर पुढील उपचाराकरिता आवश्यक त्या रुग्णांना गोडे हॉस्पिटलमध्ये स्वखर्चाने नेऊ व पुढिल उपचार करू असे आवाहन प्रकाश मारोटकर यांनी केले.

# आता प्रत्यक्ष मुलाखती घेऊनच तालुकाध्यक्षांच्या नियुक्त्या!; काँग्रेस प्रदेशाध्यक्षांचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

अमरावती : काँग्रेसने राज्यात विविध जिल्ह्यांमध्ये संघटनात्मक बांधणीचे काम हाती घेतले आहे. त्यात तालुका अध्यक्षांच्या नियुक्त्या या महत्वाच्या मानल्या जातात. यापुर्वी या नियुक्त्यांमध्ये गटातटाचे राजकारण प्रभावी ठरत असल्याच्या तक्रारी होत्या. त्यामुळे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्यभरातील तालुकाध्यक्षांच्या नियुक्त्या प्रत्यक्ष मुलाखत घेऊन करण्याचा निर्णय घेतला. आतापर्यंत प्रदेशाध्यक्षांनी स्वत: मुलाखती घेऊन एकूण ८३ तालुकाध्यक्षांच्या नियुक्त्या केल्या आहेत.



पक्षात तळागाळात काम करणाऱ्या कार्यक्षम व मेहनती कार्यकर्त्यांना या माध्यमातून महत्वांच्या पदांवर काम करण्यासाठी संधी देण्यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलल्याचे काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये संघटनात्मक बांधणी आणि पक्ष कार्याला गती देण्यास सुरुवात केली आहे. याचाच भाग म्हणून राज्यभरातील तालुकाध्यक्षांच्या नियुक्त्या प्रत्यक्ष मुलाखत घेऊन करण्यात येत आहेत.

पक्ष निरिक्षकांनी जिल्ह्यांचे दौरे करून स्थानिक पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून काही नावांची शिफारस प्रदेश काँग्रेसला केली होती. हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या निवड समितीच्या मुलाखतींनंतर या नेमणुका करण्यात आल्या आहेत. या निवड समितीत ज्येष्ठ नेते काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, विधान परिषद काँग्रेस गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, खासदार चंद्रकांत हंडोरे, खासदाी प्रणिती शिंदे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव बी. एम. संदीप, कुणाल चौधरी प्रदेश उपाध्यक्ष ड. गणेश पाटील आदींचा समावेश आहे.

# मनसेविरोधात अमराठी व्यावसायिकांची एकजूट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३ मुंबई**

मीरा रोड येथील शांती पार्क परिसरात असलेल्या जोधपूर स्वीट्स अँड नमकीन या दुकानाच्या मालकाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांकडून झालेल्या मारहाणीच्या निषेधार्थ आज संपूर्ण मीरा-भाईंदर शहरातील व्यावसायिक आणि व्यापाऱ्यांकडून दुकाने बंद ठेवण्यात आली आहेत. मारहाण झालेल्या व्यावसायिकासोबत जे घडले, ते भविष्यात इतर कोणासोबतही घडू शकते, अशा चिंतेतून व्यापाऱ्यांनी स्वतःच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर एकजूट दाखवत हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारला.

या पार्श्वभूमीवर सेवेन स्कूल, मिरा रोड (पूर्व) येथून पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांच्या कार्यालयापर्यंत एक भव्य निषेध रॅली काढण्यात येणार आहे. या घटनेच्या अनुषंगाने व्यवसायिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करत व्यापाऱ्यांनी पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांना निवेदन देण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकारामुळे शहरात तणावाचे वातावरण असले तरी व्यापाऱ्यांनी मोर्चा काढून आपला निषेध व्यक्त केला. या पार्श्वभूमीवर आता मनसेचे नेते अविनाश जाधव हे पत्रकार परिषद घेणार आहेत. या पत्रकार परिषदेत अविनाश जाधव काय बोलणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहे. मनसेने याप्रकरणात आणखी आक्रमक भूमिका घेतल्यास मीरा-भाईंदरमध्ये मनसे विरुद्ध व्यापारी हा वाद चिघळण्याची शक्यता आहे.

# विधान परिषदेतील प्रस्तावांवर चर्चा होत असतांना अधिकारी वर्गाने नोंदी घ्याव्यात



## आ.संजय खोडके यांची सभागृहाला सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये नियम २६० अन्वये प्रस्तावावर चर्चा होत असतांना संबंधित खात्यांचे अधिकारी उपस्थित नसल्याने आ.संजय खोडके यांनी सभागृहासमक्ष खंत व्यक्त केली. प्रस्तावातील चर्चे दरम्यान अधिकाऱ्यांनी नोंदी घेवून माहिती देण्याची सूचना आ.संजय खोडके यांनी केली. यावर अधिकाऱ्यांनी नोंदी घेणे गरजेचे असल्याचे विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घोषित केले.

महाराष्ट्र विधानपरिषद हे राज्य विधिमंडळाचे वरिष्ठ सभागृह आहे. या सभागृहातील कामकाज हे सर्व दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. सभागृहातील प्रस्ताव व चर्चा हि देखील तितकीच महत्वाची असून या संदर्भात सर्व माहिती सादर करणे हे संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांनी उपलब्ध करणे आवश्यक आहे. मात्र विधानपरिषदेत विविध प्रस्तावांवर चर्चा होत असतांना संबंधित खात्याचे अधिकारी उपस्थित नसल्याने आ.संजय खोडके यांनी सभागृहासमक्ष खंत व्यक्त केली. तसेच महत्वपूर्ण प्रस्तावातील चर्चे दरम्यान अधिकाऱ्यांनी नोंदी घेवून माहिती देण्याची सूचना आ.संजय खोडके यांनी केली. यावर विधान परिषदेतील प्रस्तावांवर चर्चा होत असतांना अधिकारी वर्गाने नोंदी घ्याव्यात असे पीठासीन उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घोषित केले.

# विद्यापीठातील गणित विभागाची शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय वाटचाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

पदव्युत्तर शिक्षण व संशोधनाला चालना देण्याच्या दृष्टीने स्थापन झालेला संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील गणित विभाग आपल्या उल्लेखनीय कार्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटवत आहे. एम.एस्सी., पीएच.डी. अभ्यासक्रमांसह संशोधन क्षेत्रातही आघाडीवर आहे.

**संशोधन प्रकल्पामध्ये विभागाचे यश**

संशोधनाचे मुख्य क्षेत्र सापेक्षता आणि विश्वविज्ञान असून, विभागातील ४० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या आचार्य पदवी प्राप्त केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अर्थसहाय्याने विभागाने दोन संशोधन प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केले आहेत. २००५ व २०१५ या वर्षात आइन्स्टाईनच्या विशेष व सामान्य सापेक्षता सिध्दांताच्या शताब्दी वर्षानिमित्त विभागाने आय.सी.आर.-२००५ आणि आय.सी.जी.आर.-२०१५ या दोन आंतरराष्ट्रीय परिषदांचे केलेले आयोजन शैक्षणिक क्षेत्रातील अत्यंत मानाची बाब मानल्या गेली.

**राष्ट्रीय परिषदांचे यशस्वी आयोजन**

रौप्य महोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर विभागाने गणित विज्ञानातील अलिकडच्या प्रगतीवरील राष्ट्रीय परिषद आयोजित करून देशभरातील अभ्यासकांना एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले. विभागातील २५ हून अधिक विद्यार्थ्यांनी नेट, सेट,गेट सारख्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा उत्तीर्ण केल्या आहेत. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे विभागातील काही संशोधन विद्यार्थ्यांनी इन्स्पायर फेलोशिप अंतर्गत संशोधन केलेले आहे.




**अनेक विद्यार्थी मोठमोठ्या संस्थांमध्ये कार्यरत**

विभागाचे अनेक विद्यार्थी प्राध्यापक, शोध संस्थांमध्ये संशोधक, डेटा सायन्स आणि ॲनालिस्ट, ऑपरेशन रिसर्च, फायनान्स व बँकिंग अशा अनेक क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत. या व्यतिरिक्त एम.पी.एस.सी., यू.पी.एस.सी., एस.एस.सी., बँकिंग या परीक्षांमध्ये गणिताचा विशेष उपयोग होतो. जी.आर.ई., टी.ओ.ई.एफ.एल. यांसारख्या परीक्षा देऊन परदेशामधील विद्यापीठांमध्ये पुढील शिक्षणासाठी संधी उपलब्ध आहे. येणा-या काळात इस्त्रो, डी.आर.डी.ओ., आर.बी.आय., सेबी आणि खाजगी बँकिंग क्षेत्रात वैज्ञानिक, विश्लेषक पदांची गरज निर्माण होणार आहे.

**विद्यार्थ्यांसाठी सुविधा**

गणिताच्या विद्यार्थ्यांना मशीन लर्निंग, आर्टिफिशियल इंटेलिजेंस यासारखे काही कोर्सेस करून अशा क्षेत्रात विशेष प्राध्यान्य मिळते. गेल्या तीन दशकांत विभागाने विद्यार्थ्यांना संधी, मार्गदर्शन आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्यासपीठ उपलब्ध करून देत उत्कृष्ट शैक्षणिक परंपरा जोपासली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता विभागामध्ये गणित दिवस, क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रम, माजी विद्यार्थी मेळावा असे अनेक कार्यक्रम राबविले जातात. याव्यतिरिक्त विद्यापीठामध्ये मुला - मुलींचे स्वतंत्र वसतिगृह, कमवा-शिकवा योजना, इनक्युबेशन सेंटर, सेंट्रल लायब्रारी, वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांचे व्याख्याने, खेळ, क्रीडा मैदाने, स्वीमिंग पूल, आधुनिक जीम, पोस्ट ऑफिस, एटीएम, निसर्ग रम्य वातावरण इत्यादीचा विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकासासाठी उपयोग होतो. भविष्यातही गणिताच्या क्षेत्रात नवनवीन संशोधन घडवण्याचा विभागाचा निर्धार आहे. विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर गणित विभागामध्ये आपले प्रवेश निश्चित करण्याकरिता व अधिक माहितीकरिता विभागप्रमुख यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.